



# तव चरणरजसेवा

सद्गुरु साईनाथ म्हणजे विश्वाची माउली. जगताचा पालनकर्ता श्री विष्णू. साईंचे चरणकमल म्हणजे परम सुखाचे निधान. याच चरणकमलांच्या स्पर्शाने अहिल्येचा उद्धार झाला. याच चरणकमलांना परम पवित्र मानून राजा भरताने १४ वर्षे सिंहासनावर ठेवले. याच चरणस्पर्शाने खवळलेली 'यमुना' शांत झाली आणि वसुदेवासाठी गोकुळाची वाट मोकळी झाली.

आजही याच चरणांचा स्पर्श घेण्यासाठी हजारो भक्त कित्येक तास शिरडीमध्ये रांगेत तिष्ठत उभे असतात आणि साईमाउलीच्या पादुकांवर नतमस्तक होऊन आपल्या जीवनाचे सार्थक करून घेतात.

श्री साईसच्चरिताच्या बाविसाव्या अध्यायात साईंचे परम भक्त श्री हेमाडपंत यांनी साईंच्या चरणस्पर्शाचा आणि अंगुष्ठध्यानाचा महिमा अतिशय भावपूर्ण रीतीने वर्णन केला आहे. जेव्हा हेमाडपंतांना सद्गुरु साईंचे प्रथम दर्शन झाले तेव्हा त्यांनी साईंच्या चरणी धुळीतच लोटांगण घातले. याचे वर्णन करताना त्यांनी विलक्षण ओवीची रचना दुसऱ्या अध्यायात केली आहे.

**लाधलों साईंचा चरणस्पर्श।**
**पावलों जो परामर्ष।**
**तोचि या जीवाचा परमोत्कर्ष।**
**नूतन आयुष्य तेथूनि ॥१४०॥**

हेमाडपंत शिरडीमध्ये प्रथम आले ते इ. स. १९१०च्या सुमारास. त्यावेळी साठे यांच्या वाड्यामध्ये उतारूंसाठी राहण्याची सोय होती. शिरडीच्या भूमीत ते उतरले आणि साईंच्या दर्शनाची ओढ त्यांच्या मनाला अस्वस्थ करू लागली. साईंच्या चरणांचे दर्शन होणार, या विचारानेच त्यांच्या मनामध्ये आनंदलहरी उसळल्या. इतक्यात साईंचे भक्त तात्यासाहेब नूलकर हे द्वारकामाईतून आले आणि त्यांनी समस्तांना साईंचे दर्शन लगेच घ्यावे, असे सांगितले. त्यावेळी बाबा सकाळच्या वेळी शिरडीमध्ये आपल्या भक्तांबरोबर एक फेरी मारीत असत. बाबा भक्तांबरोबर लेंडीबागेकडे निघाले होते. वाटेत वाड्याच्या कोपऱ्याजवळ येताच हेमाडपंतांनी साईंना पाहिले आणि ज्याप्रमाणे पाडस आपल्या मातेकडे धाव घेते तद्वत हेमाडपंतांनी साईंकडे धाव घेतली. धूळीमध्येच साईंच्या चरणकमलांवर लोटांगण घातले. शरीरातील रोम-न्-रोम पुलकित झाला. आकंठ भक्तिरसात न्हाऊन हेमाडपंत धन्य झाले आणि साईंच्या चरणस्पर्शाने जन्मोजन्मीच्या पापराशी जळून खाक झाल्या. साईंबद्दल जे ऐकले होते त्याहूनही कित्येक पट अधिक त्यांनी साक्षात् अनुभवले. दादर ते शिरडी या प्रवासात त्यांच्या मनामध्ये जे नाना विकल्प होते ते कुठल्या कुठे विरून गेले आणि परम आनंद म्हणजे काय, याचा साक्षात्कार त्यांना झाला. या क्षणाचे वर्णन करताना हेमाडपंत श्री साईसच्चरिताच्या दुसऱ्या अध्यायात म्हणतात...

शिरडीची ती धूळ म्हणजे साक्षात् भस्म आहे. धगधगत्या देहाला स्व-स्वरूपी शांती बहाल करणारे भस्म. साईंचे चरण म्हणजे अशाप्रकारचे मानससरोवर आहे की, ज्याच्या स्पर्शाने कावळ्याचाही हंस होतो. साई हे साक्षात् परमहंस आहेत. ते एक महान संत आहेत. आज त्यांचा चरणस्पर्श लाभला आणि जन्मोजन्मीचे पाप क्षणात संपुष्टात आले. साईंच्या चरणकमलांचे दर्शन हा माझ्या आजवरच्या जीवनातील सर्वात भाग्यवान क्षण आहे. हाच जीवनाचा परमोच्च क्षण आहे. जणू या क्षणापासून माझा पुनर्जन्मच झाला. साईंच्या नेत्रकटाक्षाच्या अनुग्रहाने माझे नवीन आयुष्य सुरू झाले...

साईंच्या दर्शनात हीच नवलाई आहे. या सगुण रूपाच्या दर्शनाने अभक्ताच्याही वृत्तीमध्ये बदल होतो. पूर्वी केलेल्या सर्व कर्मांचा मनाला तर विसर पडतोच; त्याशिवाय त्यांच्या दर्शनाने हजारो वर्षांच्या साचत चाललेल्या पापराशी क्षणार्धात पुण्यराशीत परावर्तित होतात. पंचतत्त्वाने परिपूर्ण शरीराला जी विषयाची आसक्ती निर्माण होते, साईसत्संगाच्या अमृतप्राशनाने त्याच विष-कृत्याचा हळूहळू वीट येऊ लागतो. साईंच्या चरणस्पर्शाने सारी सृष्टीच साईरूप वाटू लागते, सारी सृष्टी साईमय झाली आहे, अशी अनुभूती हेमाडपंतांना केवळ साईंच्या चरणांना वंदन केल्याने झाली.

देवत्व ओळखण्यासाठी भक्त श्रेष्ठच असावा लागतो, असे म्हणतात. केवळ साईंचे एकवार दर्शन घ्यायचे एवढा साधा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून हेमाडपंत शिरडीला आले. सकाळच्या वेळी साईंची ती सगुण मूर्ती पाहून त्यांच्या मनातील साऱ्या शंकांचा विकल्प तर नष्ट झालाच, त्याबरोबरच त्या क्षणापासून त्यांच्या नवीन जीवनाला सुरुवात झाली. केवळ दर्शनाला आलेले हेमाडपंत पुढे जन्मभर साईमय बनून राहिले. साईंच्या चरणांचा प्रताप एवढा महान आहे !

श्री साईसच्चरिताच्या २२व्या अध्यायात हेमाडपंत साईंच्या बैठकीचे रसपूर्ण वर्णन करतात. भक्तांच्या कामासाठी प्रगट झालेली साईमाउली मशीदमाईत दगडावर ज्या पद्धतीने विराजमान होत असे त्याचेही वर्णन त्यांनी केले आहे. हेमाडपंत म्हणतात, "बाबा, तुमची द्वारकामाईत नेहमी बसण्याची जी पद्धत आहे तिची थोरवी काय वर्णावी ! अनेक भक्त दर्शनाला येऊन, पायी मस्तक ठेऊन प्रेमभराने मनाचे सुख लुटतात." साईंच्या बैठकीबद्दल सांगताना हेमाडपंत **'शाखा-चंद्रन्याय'**, असा उल्लेख करतात. याचा अर्थ असा की, अमावास्या उलटली की, सर्वांना चंद्रदर्शनाची ओढ लागते. मात्र, प्रथमेचा वा द्वितीयेचा चंद्र साध्या डोळ्यांना सहज नजरेस पडत नाही. तेव्हा ती चंद्रकोर पाहण्यासाठी एखाद्या झाडाखाली गेल्यास चंद्रदर्शन होते. झाडाच्या दोन फांद्यांच्या बेचक्यामधून लहानश्या चंद्रकोरीचे लवकर दर्शन घेता येते. चंद्रकोर लहान असली तरीही झाडाच्या सावलीतून येणारा कवडसा चंद्रदर्शनाची तहान भागवतो. तशीच बाबांची बसण्याची तऱ्हा आहे. बाबांच्या पायाचा अंगठा म्हणजे द्वितीयेची चंद्रकोर आहे. भक्तांची चंद्रदर्शनाची आस हाच अंगठा तेव्हा पुरवतो, जेव्हा बाबा डाव्या गुडघ्यावर उजवा पाय ठेवून बसतात. बाबा मशिदीत दगडावर बसताना नेहमी डाव्या गुडघ्यावर उजवा पाय ठेवत असत आणि डाव्या हाताच्या अंगठ्याजवळचे पहिले बोट, अर्थात् तर्जनी आणि त्याशेजारचे मधले बोट, अर्थात् मध्यमा यांच्यामध्ये उजव्या पायाचा अंगठा ठेवत असत. ही दोन बोटे, म्हणजे झाडाच्या दोन फांद्या व त्यांच्यामध्ये असणारा पायाचा अंगठा, म्हणजे द्वितीयेच्या चंद्राची कोर, असे हेमाडपंत म्हणतात.

**ती निजभक्तांची असोशी ।**
**पुरविसी निज पायांपाशीं ।**
**वामजानूवरी दक्षिण पायासी ।**
**ठेवूनि बैससी जे समयीं ।।१५।।**
**वामकर तर्जनी मध्यमांगुळी ।**
**शाखा बेचकें अंगुष्ठ जो कवळी ।**
**त्या दक्षिणपादांगुष्ठाजवळी ।**
**नखचंद्र झळाळी बीजेचा ।।१६।।** - अ. २२

बाबांच्या या चरणाचा आणि अंगठ्याचा महिमा धन्य आहे. त्यांनी स्वतः वेणिमाधव होऊन दासगणूंना आपल्या उजव्या पायामध्ये प्रयागतीर्थाचे स्नान करविले होते. शुभ पर्व असताना प्रयागाचे स्नान करावे. ते सर्वात शुद्ध असते, असा शास्त्रसमज आहे. त्यानुसार अशाच एका शुभ समयी प्रयागाचे स्नान करावे, असा विचार करून दासगणू

साईनाथांची आज्ञा घेण्यासाठी द्वारकामाईत गेले असता बाबा त्यांना म्हणाले की, "जर तुला प्रयागतीर्थाचे स्नानच करायचे आहे, तर त्यासाठी दूर देशी का जातोस ? तू पूर्ण दृढ विश्वास ठेवून जर माझ्या चरणांवर मस्तक ठेवलेस, तर माझ्या चरणीही तुला प्रयागतीर्थाचे स्नान होईल. माझे पाय हेच तू प्रयागचा गंगा-यमुना संगम आहे, असे समज !" दासगणूंनी पूर्ण भक्तीने साईंचे स्मरण केले आणि त्यांच्या चरणांवर आपले मस्तक ठेवले आणि त्या साईंची लीला अशी थोर की, दासगणूंनी मस्तक ठेवताच साईंच्या दोन्ही अंगठ्यांतून गंगा-यमुना यांचे पाणी पाझरले. त्या पाण्याने दासगणूंचे मस्तक ओले झाले. हा चमत्कार पाहून दासगणूंचे डोळे गहिवरले. प्रेमाने उचंबळून आलेले दासगणू साईंच्या या अनुग्रहाने धन्य झाले आणि त्यांनी साईंवरती "अगाध शक्ती अघटित लीला", हे पद लिहिले. या पदामध्ये साई हे कोण आहेत, हे दासगणूंनी स्वतः लिहिले आहे. ते म्हणतात की, तुम्हाला यवन म्हणावे, तर तुमचे गंधावर प्रेम आहे आणि हिंदू म्हणावे, तर मशिदीमध्ये तुमचे वास्तव्य आहे. श्रीमंत म्हणावे, तर हातामध्ये भिक्षापात्र घेऊन सतत भिक्षा मागत फिरता व गरीब म्हणावे, तर कुबेरालाही लाजवेल असे दान आपण भक्तांना देत असता. तुम्हीच पूर्ण ब्रह्म आणि सबाह्य शुद्ध आहात. आपल्या अगाध लीलांनी त्रिदेवांच्या अघटित लीला आपण दाखविता. तुम्ही सर्व सिद्धींचे कारण आहात आणि तुम्हीच सर्व सिद्धी आहात. असे असताना आम्ही मात्र देव पाहण्यासाठी विनाकारण इकडे-तिकडे भटकत असतो. तुम्ही सर्वशक्तिमान असताना नित्याच्या व्यवहारात अडकून आम्ही पुन्हा पुन्हा नको तिकडे सुख शोधण्याचा प्रयत्न करतो.

**अधमाधम मी महापातकी शरण तुझ्या पायां ।**
**आलों निवारा दासगणूचे त्रिताप गुरुराया ।।१४।।**

अशाप्रकारे दासगणूंनी साईंचे यथायोग्य वर्णन करणारे सुंदर पद रचले आहे. ते पद हेमाडपंतांनी चवथ्या अध्यायात दिले आहे. या ठिकाणी हेमाडपंत आणि दासगणू दोघांनाही साईंच्या चरणांमध्ये अलौकिक शक्ती असल्याची खात्री पटली. साईंच्या कृपेशिवाय हेमाडपंतसुद्धा ग्रंथरचना करू शकत नव्हते आणि दासगणूंनाही ह.भ.प. म्हणून नावलौकिक मिळू शकत नव्हता. साईंच्या दर्शनापूर्वी हेमाडपंत व दासगणू हे सर्वसामान्य भक्तांप्रमाणेच होते. साईंचा जो अनुभव या उभयतांना प्रथमदर्शनी आला त्यानंतर दोघांचेही असामान्यत्व साऱ्यांच्या प्रत्ययाला आले. हा सारा साईंच्या चरणांचा प्रताप आहे. **साई म्हणे तोचि, तोचि झाला धन्य ।**

आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये आदरणीय पूज्य व्यक्ती किंवा देवता यांच्या चरणांना अत्यंत महत्त्व दिलेले आहे. भक्तीच्या नऊ प्रकारांपैकी चरण-वंदन हाही एक भक्तीप्रकार आहे. थोरांना किंवा देवतांच्या पादुकांना नमस्कार करताना आपण त्यांच्या पायांना हात लावून किंवा त्यांच्या पायांवर मस्तक ठेवून नमस्कार करतो. सद्गुरुंचे चरण म्हणजे भक्तांचे प्रयागतीर्थ असते; नव्हे असायलाच हवे. कारण गुरुचरणांचे व चरणवंदनाचे महत्त्व अलौकिक आहे.

**मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी ।**
**तेथे तुझे सद्गुरु पाय दोन्ही ।।**

आपल्या संस्कृतीमधील नमस्काराच्या प्रथेला पूर्णपणे शास्त्रीय पाया आहे. व्यक्तीच्या पायापासून, विशेषतः पायाच्या अंगठ्यापासून जे ज्ञानतंतू निघतात ते थेट व्यक्तीच्या मेंदूला जाऊन भिडतात. आपण जेव्हा हाताने किंवा मस्तकाने आदरणीय पूज्य व्यक्तीच्या चरणांना स्पर्श करतो तेव्हा त्या व्यक्तीच्या मेंदूतील उत्तम विचार, सत्त्व गुण, आध्यात्मिक ज्ञान वगैरे ज्ञानतंतूमार्गे आपल्या शरीरात प्रवेश करतात आणि आपल्या मानसिक व आध्यात्मिक उन्नतीला ते ज्ञानतंतू सहाय्यभूत होतात. हे ज्ञानतंतू भक्तांच्या शरीरात किती प्रमाणात प्रवेश करतात, हे त्या थोर व्यक्तीच्या चरणांवर नाही, तर भक्तांच्या श्रद्धेवर व साधनेद्वारा प्राप्त झालेल्या संवेदनक्षमतेवर पूर्णतः अवलंबून असते. म्हणूनच, हेमाडपंत व दासगणू यांच्यासारख्या श्रेष्ठ भक्तांना केवळ एकदाच साईंच्या चरणांना वंदन केल्याने आपल्या जीवनाची दिशा बदलणे शक्य झाले. साईंच्या शरीरातून अव्याहत वाहणाऱ्या या ज्ञानतंतूंना ग्रहण करण्याएवढी संवेदनक्षमता त्यांच्या देहामध्ये निर्माण झाली होती. ही शक्ती त्यांच्या हृदय, मन व शरीर यांमध्ये केवळ भक्तीमुळेच निर्माण होऊ शकली. अशी शक्ती प्रत्येकाच्या हृदयात निर्माण होण्यासाठी सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे निस्सीम भक्ती व अढळ श्रद्धा. थोर व्यक्तींच्या चरणांवर

वारंवार नतमस्तक होऊनही काही लोकांमध्ये काहीही फरक पडत नाही; याचे कारणही हेच आहे की, त्या निर्माण झालेल्या लहरी ग्रहण करण्याची त्यांची मानसिक व शारीरिक क्षमता वा तयारी नसते. संतमंडळींच्या पादुका, मग त्या चांदीच्या असोत की लाकडाच्या वा दगडाच्या किंवा इतर धातूंच्या असल्या तरीही त्या सज्जनांच्या पायांप्रमाणे त्या सगुण पादुकांमध्ये दिव्य शक्ती अविरत वाहत असतेच.

**जरी हे शरीर गेलो मी टाकून,**
**तरी मी धावेन भक्तांसाठी।**

श्री साईनाथ नित्य जीवित आहेत, असे ते स्वत: सांगत असताना आपण त्यांचा अनुभवही घेत नाही आणि पादुकास्पर्श करताना तशी भावनाही उराशी बाळगीत नाही. साईनाथांनी हा चरणसेवेचा महिमा आपल्या भक्तांना पटवून देण्याचा नेहमीच प्रयत्न केलेला आहे. साईंची द्वारकामाईमधील बैठक असो किंवा त्यांची सध्या द्वारकामाईत लावलेली तसबीर असो, या ठिकाणी बाबा आपला उजवा पाय पुढे करून बसलेले आहेत. साईबाबा शिरडीमध्ये फिरताना पायात काहीही घालत नसत व सर्व गावभर धूळीत विहार करीत असत. तरी त्यांचे तळपाय अगदी स्वच्छ असत. साईंचे पादसंवाहन केलेल्या अनेक भक्तांना असा अनुभव आला आहे की, साईंचे दोन्ही पाय अगदी लोण्यासारखे मऊ होते. याचा अर्थ असा की, माणसाच्या मेंदूतील विचारांचा, ज्ञानाचा, सात्त्विकतेचा व शुद्धतेचा परिणाम त्याच्या पायांवर उमटत असतो. आपल्या बैठकीतून साईनाथ भक्तांना चरण-वंदन या भक्तीची आठवण करून देतात. डाव्या गुडघ्यावर उजवा पाय ठेवून व तर्जनी-मध्यमा अंगठ्याजवळ धरून साईमाउली भक्तांना हा सोपा उपाय दाखविते आणि म्हणते, ''अभिमान टाकून देऊन, सर्व प्राण्यांसमोर नम्रपणे मान तुकवून या एका अंगठ्याचे ध्यान करा ! हेच भक्तीचे मोठे व सोपे साधन आहे.''

**म्हणे होऊनि निराभिमान।**
**सर्वांभूतीं खालवा मान।**
**करा एक अंगुष्ठध्यान।**
**सोपें साधन भक्तीचे॥**

हेमाडपंत आणि दासगणूंप्रमाणे श्रेष्ठ प्रतीची भक्ती जरी आपणाकडे नसली तरी आपण साईंच्या चरणांचे नित्य-नियमित ध्यान करून एवढी तरी भीक मागू शकतो,

**माझा निजद्रव्यठेवा । तव चरणरजसेवा।**
**मागणें हेंचि आतां। तुम्हां देवाधिदेवा॥**

**- अतुल महाजन**
१०६ नील अपार्टमेंटस,
लोकमान्य नगर, पाडा क्र.२,
ठाणे (प.).

❑❑❑

**श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे**
**नवीन प्रकाशन**
**वाचताना शिरडीत असल्याचा भास**
**निर्माण करणारी व**
**क्षणाक्षणाला उत्कंठा वाढविणारी**
**श्री साईंच्या प्रत्यक्ष सान्निध्यातील**
**दादासाहेब खापर्डे यांची**





**पृष्ठे : १५२**

# शिरडी रोजनिशी

**मूल्य : रु. १५ केवळ**

## मरूनि जगणे 'तेव्हा' कळले

धुनीतील लाकूड म्हणाले,
आज माझे भाग्य फळा आले
होते नशिबी पुण्य निराळे,
म्हणूनि साईहाती जळाले.....
जन्म घेतला दाट वनी मी,
वृक्षाचा त्या घटक म्हणूनि
अलग होऊनि वृक्षापासूनि,
अंती जाहले निजण्या फळी मी
धन्य धन्य ते जिणे आगळे,
जनाच्या मुखी नावलौकिक झाले.....
होते नशिबी.....
चंदन झिजते त्या पूजनास्तव,
मी जळते त्या ज्वलनास्तव
ध्येय जागते त्या मिटण्यास्तव,
अंती गंध ते मी तर विस्तव
जळता जळता रूप बदलले,
साईकृपे विभूती झाले.....
होते नशिबी.....
कुणी लाविती श्रद्धेने मज,
कुणी प्राशिती पाण्यातूनि मज
व्याधी हरणे माझे काज,
भेद न कसला ठाऊक तो मज
साईहातीचा रजकण म्हणूनि,
भक्ताभाळी स्थान मिळाले.....
होते नशिबी.....
यवनांसी तो रहीम दिसावा,
वैष्णवांनी तो राम पहावा
अल्ला मालिक एकचि आहे,
अद्वैताचा भाव वसावा
जगती येता मरण ना टळे,
मरूनि जगणे 'तेव्हा' कळले.....
होते नशिबी.....

- संजय परळकर
दादर, मुंबई.

□□□



# साई वंदना

## स्मरा रे साईराम माझा

शिरडीचा राजा। स्मरा रे साईराम माझा।
सिंहासनी ते रूप मनोहर।
सालंकृत अन छत्र शिरावर।
वरा द्यावया सिद्ध सदा कर।
भक्तांच्या काजा। स्मरा रे साईराम माझा ॥१॥


कुणी रोगी अन् कुणी गांजले।
भवतापाने कुणी पोळले।
कुणी सन्मार्गा असे विसरले।
दावी मार्ग साचा। स्मरा रे साईराम माझा ॥२॥

भक्तिभावे घेता दर्शन।
मनापासूनि करिता पूजन।
संकटातूनि करितो रक्षण।
भक्ताचा राजा। स्मरा रे साईराम माझा ॥३॥

श्रद्धा सबुरी हा उपदेश।
देतो सर्वां हा जगदीश।
महिमा उदीचा असे विशेष।
चिदानंद माझा। स्मरा रे साईराम माझा ॥४॥

- सुशिला कुळकर्णी
३, लोकमान्य नगर,
इंदूर, म. प्र.

□□□



शंकर महाराज प्रगट दिन
(कार्तिक शु. ८, १२ नोव्हेंबर २००२)

## द्या मज आशीर्वाद !

ॐ गुरुदेव । ॐ गुरुदेवा ॥
देवा श्री शंकर महाराज,
ऐका माझी साद आणि
द्या मज आशीर्वाद ॥ धृ ॥

तुम्हीच माझे तात आणि
तुम्हीच माझी माय।
हात जोडूनि तुमच्या चरणी
मागू आणखी काय?
द्या मज आशीर्वाद ॥ १ ॥

माय-पित्याच्या छायेसाठी
दुरावलेला मी एक।
भरल्या नयनी मिटल्या ओठी
करू कसा उल्लेख।
द्या मज आशीर्वाद ॥ २ ॥

कोणाविषयी कधीही केव्हा
मनात नसू दे हेवा।
वेळोवेळी असू दे देवा
आपुलकीचा ठेवा।
द्या मज आशीर्वाद ॥ ३ ॥

– गीतकार रमेश अणावकर
दादर, मुंबई.

❑❑❑

## साईनाथ गुरु

साईनाथ गुरु
भक्तांचा आधारू
भाव आपपरू
भेद नसे ॥१ ॥

चैतन्याचा गाभा
माझे साईबाबा
श्रद्धा शांती प्रभा
प्रकटसे ॥२ ॥

नाथपंथी साई
असे दत्तमूर्ती
विश्वव्यापी कीर्ती
होत असे ॥३ ॥

शरण त्या जाता
पावतसे भक्ता
कर्ता करविता
साई असे ॥ ४ ॥

## शिकवण

नको माळ नको जप
नको भक्तीचा देखावा
शिरडीग्रामी वसे माझा
जीवीचा विसावा ॥ १ ॥

टाळमृदुंगाचा घोष
नको उपासतपास
श्रद्धा हीच पूजा
अखंड तो ध्यास ॥ २ ॥

नको डामडौल काही
नको पायीची ती वारी
रंजल्या-गांजल्यांसाठी
साईनाथांची फकिरी ॥ ३ ॥

साऱ्या जगात नांदावा
सर्वधर्मसमभाव
सारी साईंची लेकरे
दृढ धरी मनी भाव ॥ ४ ॥

– गीतकार नामदेव लोटणकर
५/१३, आर्यनगर, ताडदेव, मुंबई.

❑❑❑

## अभंग

कासयासि देवा, मोहाची उपाधी,
आधीसंगे व्याधी - जळो जाय !
कुठूनिया आलो, कुठे बा चाललो,
कशासी खेळलो - खेळ सारा !
संसार-संसार, क्षणाचा बाजार,
संपता भांडार - उलगतो !
अगा रानोमाळी, चुकावे वासरू,
तैसा वाटसरू - चुकलेला !
आतल्या आवाजा, हाक दिली कोणी,
सुख दुःख दोन्ही - एकरूप !
मिठी घालूनिया, हरिचरणास,
अखेरचा श्वास - सोडीन मी !

**- जगदीश खेबुडकर**
(ख्यातनाम गीतकार)

❑❑❑

## विश्वंभर तू साईनाथा

पुण्यवंत तू, दयावंत तू, कीर्तिवंतही तू
विश्वंभर तू, साईनाथा, परमपावना तूं॥ धृ. ॥

मच्छिंदर तू, जालंदर तू, ज्ञानेश्वरही तू
तूच बोधला, तूच सावता, माणिकप्रभूही तू
तुकाराम तू, सखाराम तू, रामदासही तू
विश्वंभर तू, साईनाथा, परमपावना तू॥ १ ॥

कुणी म्हणावे यवन असे तू, कोणी म्हणे हिंदू
कुणी म्हणावे यदुभूषण तू, साऱ्यांचा बंधू
तुला आपुले करून घ्याया, जनतेचा हेतू
विश्वंभर तू, साईनाथा, परमपावना तू॥ २ ॥

कुणी तुला सुकुमार म्हणावे, कुणी महांकाळ
तू विश्वाचा तारणहार, करिशी सदैव सांभाळ
चित्स्वरूपा तू, परिपूर्णा तू, ज्ञानसिंधूही तू
विश्वंभर तू, साईनाथा, परमपावना तू॥ धृ. ॥

**- शरद पिदडी**
'रमाई', महादेव नगर, यवतमाळ.

❑❑❑

## [illegible]

प्रभू तुझा महिमा अपरंपार,
जाहला साईसाक्षात्कार
विघ्नहर्ता तूच विनायक,
सृष्टीकर्ता तू जगचालक
जडमुडांचा चैतन्याचा,
असे तुजवरी भार ॥
वंशदीप तू बहुत लावले,
दुःखीताला प्रमुदित केले
अनेक रूपे दर्शन दिधले,
कृपासागरा महिमा अपरंपार ॥
बाळ ध्रुवाला अधर झेलला,
प्रल्हादास्तव स्तंभी प्रगटला।
घोर संकटी गजेन्द्र पडला,
नेले संकट पार ॥
कथा असे ही तुझी पुराणी,
प्रत्यक्षातच अनुभववाणी
तरुरूपाने साकारूनि तू,
रक्षियला परिवार ॥
अघटित किमया साईराया,
तुझ्या कृपेने मानवी काया
आदेशाने आली सहाया,
दिधलासी आधार ॥
तेलावाचूनि दीप लावला,
प्रकाश माझे सदनी आला
वंदन करते मूक मनाने,
शब्दाला न आकार ॥
जाहला साईसाक्षात्कार,
जाहला साईसाक्षात्कार...

**- कै. सुशिला मा. दीक्षित**
(संग्रहिका : मीनल वाड)

❑❑❑

## साईंची वारी

जय जय साईविठ्ठल
जय जय हरीविठ्ठल
मी शिरडीची केली वारी
उभा साई विटेवरी
मूर्ती साजरी पाहून
वाटे आले मी पंढरी
शिरडी माझी ग पंढरी
शिरडी झाली दुजी पंढरी
जय जय साईविठ्ठल...
आधी गणगौरी पूजिली
विष्णू लक्ष्मी मणिपुरी
अनहाती दुर्गामाई
जगदंबा पूजिली
साई माझा विठ्ठल झाला
विठ्ठल माझा साई झाला
मनमंदिरी हासला
झाला पांडुरंग साई
शिरडी माझी ग पंढरी
चला साईदर्शना जाऊ
ॐ श्री साई साई गाऊ...
साईच्या चरणी माथा
हे साई सद्गुरुनाथा !
त्रिताप हरवूनि साई
देतो चैतन्यधारा
चैतन्यधारा
चला साईदर्शना जाऊ
ॐ श्री साई नाम गाऊ ...

**- सौ. स्मिता के. आव्हाड**
'श्री', कल्पना हाऊसिंग सोसायटी, प्रभाग क्र. ७,
कॅनॉल रोड, श्रीरामपूर.

❑❑❑

## हरिरूप हरिनामे हरिमय होऊनिया

हरिनाम येई त्याला सदा सौख्य आहे
हरिनामाविण राहे तोचि खेद वाहे
चिकटते विषयाचे तयाला 'गोचिड'
धावे विषयाच्या मागे सोडूनिया भीड
परी दुःखावाचूनि ना काही हाती पाहे
मृगजळ आहे सारे विषयाचे सुख
लागते न हाती काही वाढतेच भूक
चित्त विचलित होई भाव दुःख साहे
कशासाठी वहायचा विषयांचा भार
हरिनाम घेई त्याचा स्वच्छ हो विचार
हरिमय हरिरूप होऊनिया जाए

**- दत्तात्रय जयवंत जोशी**
६९५ (ब) नवा, सदाशिव पेठ, पुणे.

❑❑❑

## आविष्कार

साईबाबा संकटविमोचन करणारे
यासाठी साईंचे करावे स्मरण
हाक मारताच येतात धावून
अनेक आहेत याची उदाहरणं
संतांची सेवा करूनि सत्संग
करावा हा धर्म कलियुगाचा
संत-महात्म्यांचा महिमा फार
यासाठी अवतार साईबाबांचा
परमेश्वराचा सगुण अवतार
साई संकटातून सोडविणार
त्वरित पावतात ते नवसाला
भक्त असावा नवस फेडणारा
साईंच्या अनेक आहेत लीला
त्यांच्या जीवनातील ते चमत्कार
चमत्काराशिवाय नमस्कार नाही
हा कलियुगाचा असे आविष्कार

**- वि. वि. देवगावकर**
एन २, चैतन्यनगरी, वारजे, पुणे.

❑❑❑

# धन्य धन्य हो



# प्रदक्षिणा सद्गुरुरायाची

महाराष्ट्रातील प्रमुख पाच संप्रदायांमध्ये दत्तसंप्रदायाचे स्थान मोठे वैशिष्ट्यपूर्ण आहे. वारकरी, महानुभाव, नाथ, समर्थ या संप्रदायांप्रमाणेच दत्तसंप्रदायाचेही कार्य नोंद घेण्यासारखे मौलिक आहे. भारतातील ज्या राज्यांत दत्तसंप्रदायाचा प्रचार-प्रसार आहे त्यामध्ये महाराष्ट्र हे सर्वांत अग्रेसर आहे. दत्तसंप्रदायाची महाराष्ट्रातील विविध तीर्थक्षेत्रे आणि दत्तसंप्रदायी विभूतींची थोर परंपरा दत्तसांप्रदायिकांची श्रद्धास्थाने आहेत. अशा या संप्रदायाबद्दल.....

**ध्यानमूलं गुरोर्मूर्तिः पूजामूलं गुरोः पद्म।**
**मंत्रमूलं गुरोर्वाक्यं, मोक्षमूलं गुरोः कृपा॥**

महाराष्ट्र ही संतांची, वीरांची आणि विभूतींची भूमी आहे. विठ्ठलभक्तीची भीमा-चंद्रभागा वारकरी संप्रदायाच्या रूपात इथे प्रवाहित झाली. इथेच महानुभावांनी समतेच्या संदेशाचा मळा फुलविला. इथेच समर्थांच्या श्लोकांनी दऱ्याखोऱ्यांतून स्वाभिमानाचा, अस्मितेचा स्वर आळविला. इथेच नाथपंथीयांनी भक्तियोगाचे बीजारोपण केले आणि इथेच दत्तभक्तीची अमृतवेल बहरली.

दत्तसंप्रदाय हा अद्वैती संप्रदाय मानला जातो. श्रीमद् भागवतामध्ये भगवान विष्णूंचे २४ अवतार सांगितले आहेत. श्री दत्तात्रेय त्यापैकी ६वा अवतार मानतात. दत्तात्रेय अवतारास पूर्ण ब्रह्मावतार म्हणतात. म्हणूनच अविनाशी अवतार म्हणूनही त्याचे वर्णन केले जाते. भगवान दत्तात्रेय यांनी अवधूत, फकीर, मलंग या वेषात अनेक भक्तांना दर्शन दिले आहे. त्यामुळे मुसलमान सूफी संप्रदायात दत्ताबद्दल विशेष आस्था - आदर दिसून येतो. हिंदू - मुसलमान ऐक्यासाठी दत्तसंप्रदाय एक उत्तम आधारशिला आहे. कर्नाटकातील हुमणाबाद येथील माणिक प्रभू आणि महाराष्ट्रातील शिरडीनिवासी श्री साईबाबा हे दत्तसंप्रदायी मानले जातात. या दोन्ही ठिकाणी आपणास हिंदूंसमवेत मुसलमान भक्तही मोठ्या संख्येने दिसतात. धर्म, पंथ आणि उपासना पद्धतीच्या नावावर माणसामाणसात भेदभाव करून द्वेष, मत्सर, हिंसा पसरविण्यापेक्षा प्रत्येक धर्मातील माणुसकी - बंधुत्व या तत्त्वांना प्राधान्य देऊन विश्वबंधुत्वाचा मानव धर्म सर्वत्र प्रचारित होण्याची आज अत्यंत गरज आहे.

दत्तसंप्रदायाच्या भौगोलिक व्याप्तीचा विचार करता मुख्यतः महाराष्ट्र - कर्नाटक - आंध्र आणि गुजरात हा भाग आपल्या डोळ्यांपुढे येतो. महाराष्ट्रातील कारंजा, नृसिंहवाडी, औदुंबर, अक्कलकोट; कर्नाटकातील गाणगापूर; आंध्रातील कर्दलीवन आणि गुजरातमधील गिरनार ही दत्तस्थाने प्रसिद्ध आहेत.

**भूयो भूतात्मनो विष्णोः प्रादुर्भावो महात्मनः।**
**दत्तात्रेय इति ख्यातः क्षमया परया युतः॥**

अशा शब्दांत ब्रह्मपुराणामध्ये दत्तावताराचा महिमा वर्णन केलेला आहे. भगवान विष्णूंचा प्रभू दत्त हा क्षमाप्रधान अवतार मानला जातो.

दत्तमंदिरात आपणास कुठे केवळ पादुका दिसतात, कुठे एकमुखी दत्तमूर्ती-चित्र आढळते तर बहुतेक ठिकाणी तीन मुखी दत्तमूर्तींची स्थापना दिसून येते. श्री वासुदेवानंद सरस्वती यांनी 'दत्तात्रेय षोडशावतार' या पोथीमध्ये भगवान दत्तात्रेयांच्या १६ अवतारांचे गुणवर्णन केलेले आहे. १) योगीराज २) अत्रिवरद ३) दत्तात्रेय ४) कालाग्निशमन ५) योगीजनवल्लभ ६) लीलाविश्वंभर ७) सिद्धराज

८) ज्ञानसागर ९) विश्वंभरावधूत १०) मायामुक्तावधूत ११) आदिगुरु १२) शिवरूप १३) देवदेवावतार १४) दिगंबर १५) श्यामकमललोचन असे ते १६ अवतार आहेत. ही नावे १५ आहेत. कारण 'मायामुक्तावधूत' नावाचे २ अवतार झाले आहेत.

प्रभू दत्तात्रेयांनी विविध कार्यासाठी १६ अवतार घेतले तद्वतच २४ गुरु केले आहेत. **''जो जयाचा घेतला गुण।''** असा प्रत्येकाकडून एकेक गुण दत्तांनी घेतला आहे व त्याला गुरु मानले आहे. १) पृथ्वी २) पवन ३) व्योम ४) उदक ५) अग्नी ६) चंद्रमा ७) सूर्य ८) कपोत ९) अजगर १०) समुद्र ११) पतंग १२) भृंग १३) मातंग गज १४) मधमाशी १५) मृग १६) मत्स्य १७) पिंगळा वेश्या १८) टिटवी १९) बालक २०) कुमारीचे कंकण २१) सर्प २२) शरकार २३) कुंभारीण २४) कोळी असे हे दत्ताचे २४ गुरु आहेत. पृथ्वीपासून क्षमा, वायुपासून अनासक्ती, आकाशापासून समता, पाण्यापासून निर्मळता, अग्नीपासून तेज, चंद्रापासून शीतलता, सूर्यापासून रस असा प्रत्येकाकडून दत्तांनी एकेक गुण घेतला आहे आणि गुरुतत्त्वाची व्यापकता दर्शविली आहे.

ब्रह्मांड पुराणामध्ये 'श्री गुरुगीता' आहे. या गुरुगीतेमध्ये दत्तात्रेयांचा अनंत अगाध महिमा वर्णन केलेला आहे. 'गुरु' या शब्दाची व्याख्या सांगताना गुरुगीताकारांनी म्हटले आहे :-

**गुकारस्त्वन्धकारश्च रुकारस्तेज उच्यते।**
**अज्ञान ग्रासकं ब्रह्म गुरुरेव न संशयः॥**

**'गु'** शब्द अंधःकार - तमस या अर्थाचे वहन करतो, तर **'रु'** शब्द ज्ञानप्रकाशअर्थी आहे. अज्ञानाचा अंधार दूर करून सत्यार्थ ज्ञानप्रकाशाने जो उदीत करतो तो गुरु !

अनेक दत्तभक्तांच्या मुखी सतत असणारा श्लोक -

**ब्रह्मानंदं परम सुखदं केवलं ज्ञानमूर्तिं।**
**द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यम्।**
**एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षीभूतम्।**
**भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरु तं नमामि॥**

हा गुरुगीतेमधीलच आहे. केवळ दत्तभक्त - दत्तसंप्रदायीच नव्हे तर अन्य संप्रदायांतील भक्त-भाविक आपल्या गुरुचे स्तवन - चिंतन करताना हाच श्लोक उच्चारतात. गुरु हाच माता, गुरु हाच पिता, बंधू, बहीण, चुलताही गुरुच, अशी अढळ एकनिष्ठा या संप्रदायात महत्त्वाची मानली आहे.

दत्तसंप्रदायाच्या अवधूत शाखा, आंध्रप्रदेश शाखा, कर्नाटक शाखा, गुजरात शाखा, टेंबेस्वामी शाखा, दत्तनाथ शाखा, देवनाथ शाखा, निरंजन रघुनाथ शाखा, नृसिंह सरस्वती शाखा, गुरुचरित्र शाखा, स्वामी समर्थ शाखा, सकलमत संप्रदाय शाखा अशा वेगवेगळ्या १२ शाखा विद्यमान आहेत. वेदांतसार, अवधूत गीता, प्रबोध चंद्रिका, गुरुचरित्र, गुरुलीलामृत, स्वात्मसंवित्युपदेश, दत्तप्रबोध, दत्तमाहात्म्य, दत्तात्रेयकल्प, ज्ञानमार्तंड, दत्तबावनी हे दत्तसांप्रदायिक भक्तांमध्ये प्रिय असे प्रमुख ग्रंथ आहेत.

दत्तसांप्रदायिक संत-महात्मे-विभूती म्हणून अक्कलकोट स्वामी समर्थ, गुळवणी महाराज, श्रीपादवल्लभ, नृसिंह सरस्वती, वासुदेवानंद सरस्वती, बीडकर महाराज, रावसाहेब सहस्त्रबुद्धे, नानामहाराज तराणेकर, साठेबाबा, निरंजन माधव, रघुनाथ माधव, पाचलेगावकर महाराज, गजानन महाराज (शेगाव), हुमणाबादचे माणिक प्रभू यांच्यामध्ये आपल्या साईबाबांचाही समावेश करण्यात येतो.

साईबाबांच्या समाधी मंदिरात रोज ४ वेळा आरती होते. या आरतींमध्ये **''जयदेव जयदेव दत्ता अवधूता। साई अवधूता।''** अशी एक आरती आहे. तसेच **''ऐसा येई बा। साई दिगंबरा। अक्षयरूप अवतारा। सर्वहि व्यापक तू। श्रुतिसारा। अनुसयाऽत्रिकुमारा''**॥ धृ॥ हीसुद्धा एक आरती प्रसिद्ध आहे. **''न दत्तगुरु साई मा, मजवरी कधीही रुसो।''** अशी एक भावकरुण विनवणी - याचना साईबाबांच्या आरतीवेळी केली जाते. श्री साईबाबांनी कोणत्याही विशिष्ट गोष्टीचा आग्रह न धरता **''जया मनी जैसा भाव। तया तैसा अनुभव।''** या उक्तीनुसार भक्ताच्या इच्छेनुरूप त्याच्या इष्टदेवतेच्या रूपात त्याला दर्शन दिलेले आहे. साईभक्त पितळे यांची कथा हेमाडपंतलिखित 'श्री साईसच्चरित' या पोथीत समाविष्ट आहे. श्री. पितळे यांना बाबांनी अक्कलकोट स्वामी समर्थांच्या रूपात दर्शन देऊन ''ईश्वर एक आहे'' या तत्त्वाचा बोध घडविला आहे. शिरडीमध्ये जे उत्सव साजरे होतात त्यामध्ये 'दत्तजयंती'चाही समावेश आहे. दत्तजयंतीनिमित्त साईंच्या दत्तरूपाचे स्मरण करीत करीत आपण दत्तसंप्रदायाचेही शब्ददर्शन घेतले आहे.

**गुरु देवदत्त !**

**- विद्याधर ताठे**

❑❑❑

# साईंच्या सान्निध्यात

## काशीराम शिंपी - आप्पा जागले - वामन तात्या - देवीदास - जानकीदास - गंगागीर महाराज



- सौ. मुग्धा दिवाडकर

### काशीराम शिंपी

**सा**ईबाबा मशिदीत वास्तव्यास आल्यापासून काशीराम शिंपी त्यांना शिधापाणी, तंबाखू व चिलीम पुरवीत असे. तसेच धुनीसाठी सरपणही तोच देत असे.

बाबा शिरडीस प्रथम आले तेव्हा त्यांचा पोशाख भगवी कफनी, भगवी टोपी व भगवे धोतर हा होता. बाबा कधी कधी पांढरी कफनीही घालीत व डोक्यास धोतरही बांधीत असत. काशीरामने बाबांना हिरवी कफनी आणि हिरवी टोपी शिवून दिली. ती ते घालीत असत. नंतर काही दिवसांनी बाबा पांढरी कफनी घालू लागले आणि डोक्याला पांढरे धोतर बांधू लागले. हाच पोशाख मग बाबांनी शेवटपर्यंत कायम ठेवला.

जरूर पडल्यास बाबांना पैसेही द्यावयाचे काशीरामचे व्रत होते. पुढे पुढे तो आपली सर्व कमाईच बाबांपुढे ठेवू लागला आणि बाबांनी त्यांच्या इच्छेस येईल तेवढी रक्कम आपणास द्यावी; असा प्रेमळ आग्रह अट्टाहासाने बाबांजवळ धरू लागला. बाबा मात्र पैसा - दोन पैसे इतकेच घेत. बाबांनी कमी पैसे घेतले किंवा नाहीच घेतले की, काशीरामला फार वाईट वाटे.

अशातऱ्हेची भावना निर्माण होणे, हे पारमार्थिक उन्नतीला बाधक आहे; कारण त्यामुळेही अहंकार उत्पन्न होऊ शकतो; माझी देण्याची शक्ती आहे, असा अभिमान त्यात शिरतो. पुढे काशीरामची पैशासंबंधाने जेव्हा ओढाताण सुरू झाली तेव्हा बाबांनी त्याच्याकडे सतत पैसे मागण्याचा सपाटा लावला. त्यामुळे शेवटी काशीरामचा अहंकार गळून पडला आणि त्याची आर्थिक परिस्थिती हळूहळू सुधारून पूर्ववत झाली. बाबांनी आपल्याकडून दक्षिणा घेतलीच पाहिजे, या त्याच्या आत्यंतिक आग्रहाने त्याच्या ठिकाणी निर्माण झालेला एक प्रकारचा आध्यात्मिक उन्नतीला बाधक अहंकार गळून पडला.

काशीरामने बाबांची अक्षरश: तन-मन-धनाने भक्ती केली.

काशीरामचा कापड विकण्याचा धंदा होता. त्यासाठी तो निरनिराळ्या गावी जाऊन बाजाराच्या दिवशी दुकान मांडत असे. एकदा तो नाऊरच्या बाजाराहून परत येत असता काही लुटारू भिल्लांनी त्याला अडविले. काशीराम घोड्यावर होता. त्याच्याकडच्या सर्व चीजवस्तू दरोडेखोरांनी हिसकावून घेतल्या. त्यांच्या या कृत्यास काशीरामने अजिबात विरोध केला नाही. पण, त्याच्याजवळ एक लहानशी पुरचुंडी होती; ती तो देईना. दरोडेखोरांना वाटले की, त्यात काहीतरी मौल्यवान वस्तू असणार ! वास्तविक त्या काळी शिरडीस वास्तव्य करून असणारे एक थोर सत्पुरुष जानकीदास यांनी, "मुंग्यांना साखर घालत जावी", असा उपदेश केल्यापासून काशीराम नेहमीच आपल्याजवळ पिठीसाखरेची पुरचुंडी बाळगीत असे. सत्पुरुषाचा आदेश म्हणून त्याला ती पुरचुंडी प्राणप्रिय होती. वाट्टेल ते झाले तरी चालेल; पण ती पुरचुंडी दरोडेखोरांच्या हाती जाऊ द्यायची नाही, असे त्याने ठरविले.

एवढ्यात एका दरोडेखोराच्या हातून बाजूला पडलेल्या तलवारीकडे काशीरामचे लक्ष गेले आणि निमिषार्धात ती उचलून त्या दरोडेखोरांपैकी दोघाजणांस त्याने ठार मारले. हे पाहून तिसऱ्या दरोडेखोराने पाठीमागून येऊन काशीरामच्या डोक्यावर कुऱ्हाडीचा जीवघेणा घाव घातला. काशीराम बेशुद्ध होऊन मृतवत पडला. दरोडेखोरांना वाटले, तो मेला; म्हणून त्यांनी तेथून पळ काढला.

थोड्या वेळाने काशीराम सावध झाला. त्याने इस्पितळात जायचे नाकारले. "मला शिरडीस घेऊन चला", असा त्याने आग्रह धरला.

बाबांच्या सांगण्यानुसार माधवराव देशपांड्यांकरवी औषधोपचार होऊन काशीराम पूर्ण बरा झाला.

काशीरामच्या या शूर कृत्याबद्दल सरकारकडून त्याला एक तलवार बक्षीस देऊन गौरविण्यात आले. काशीरामची दरोडेखोरांशी झटापट चालू असताना बाबांनी शिरडीत आकांत करून सोडला. एकसारख्या शिव्या, आरडाओरड इत्यादी प्रकारे क्षोभ प्रगट होऊ लागला. हा सगळा प्रकार आपल्या एखाद्या भक्ताला संकटातून सोडविण्यासाठीच चाललेला आहे, हे जवळ असलेल्या मंडळींच्या लगेच लक्षात आले. खरोखरच, दरोडेखोर बरेच होते, त्यांच्याकडे हत्यारेही बरीच होती; तरीही त्यांना चुकवून काशीरामला बाबांनी मृत्यूच्या जबड्यातून सुरक्षितपणे बाहेर काढले.

त्यानंतर काही वर्षांनी शके १८३० (इ. स. १९०८), चैत्र शुद्ध एकादशीच्या दिवशी काशीरामचे निधन झाले.

त्याचप्रमाणे म्हाळसापती - काशीराम यांचे संगेसोबती व बाबांचे एकनिष्ठ भक्त आप्पा जागले यांनाही मृत्यूसमयी एकादशीच लाभली.



### वामन तात्या

**बा**बा कधी कधी रहात्यास जात. रहाता हे गाव शिरडीपासून ३ कि. मी. अंतरावर आहे. बाबा तेथून परत येताना झेंडू, जाई, जुई इत्यादी फुलांची रोपे आणत. मशिदीच्या मागे निंबवृक्षाजवळ आणि गावाच्या वेशीच्या भिंतीजवळ असलेल्या उजाड जागेत बाबांनी सुंदर बाग फुलवली होती. त्या काळात बाबांचे एक भक्त वामन तात्या कुंभार हे त्यांना रोज मातीचे दोन घडे पुरवत. बाबा त्यांना ते मातीचे घडे भाजून न देता तसेच कच्चे देण्यास सांगत. या

घड्यांतून प्रतिदिनी बाबा मशिदीपासून काही अंतरावर असलेल्या आडामधून पाणी आणीत व स्वतःच्या हातांनी त्या रोपांना पाणी शिंपडीत.

संध्याकाळ झाली की, बाबा निंबातळी ते कच्चे घडे तसेच परत ठेवून देत. ठेवण्याचा अवकाश, घडे लगेच दुभंगून जात. तीन वर्षे बाबांचा हा उद्योग चालला होता. वामन तात्याही सतत तीन वर्षे बाबांना नित्यनियमाने घडे पुरवीत असत. याच जागी पुढे साठेवाडा बांधला गेला.

## देवीदास

देवीदास नावाचे एक थोर सत्पुरुष प्रथम शिरडीत आले तेव्हा ते केवळ १०-११ वर्षांचे होते. त्यांचे डोळे विलक्षण तेजस्वी व रूप अत्यंत मनमोहक होते. बांधा सुडौल होता. कमरेला लंगोटी लावलेला हा कोवळा पोरगा मारुतीच्या देवळात उतरला होता.

आप्पा भिल्ल, म्हाळसापतींसारखी भाविक मंडळी देवीदासांकडे जात-येत असत. काशीराम वगैरे त्यांना शिधा देत. वऱ्हाडाबरोबर बाबा शिरडीस आले त्याच्याआधीच बारा वर्षेअगोदर देवीदास शिरडीत येऊन राहिले होते. (बाबा पहिल्यांदा शिरडीत आले ते ३ वर्षे राहून अदृश्य झाले आणि मग साधारण ३ वर्षांनी चांदभाईच्या वऱ्हाडाबरोबर पुन्हा शिरडीस आले. त्याअर्थी सुरुवातीच्या बाबांच्या ३ वर्षांच्या शिरडीच्या वास्तव्यात बाबांच्या देवीदासांबरोबर भेटी-गाठी झाल्या असाव्यात, असा तर्क काढता येईल.)

देवीदास महाज्ञानी होते. तात्या पाटलांनी, तसेच काशीनाथ वगैरेंनी त्यांचे शिष्यत्व घेतले होते.

बाबा शिरडीतील पडक्या मशिदीत राहू लागल्यावर देवीदासांच्या सहवासात त्यांचा वेळ जाऊ लागला. त्यांची बैठक मधून मधून देवीदासांच्या संगतीत कधी चावडीत, तर कधी देवीदास रहात असलेल्या मारुतीच्या देवळात असे.

## जानकीदास

देवीदास शिरडीत आल्यावर कालांतराने जानकीदास गोसावी नावाचे दुसरे सत्पुरुष येऊन काही काळपर्यंत शिरडीत वास्तव्य करून होते.

बाबांच्या जानकीदासांबरोबर नित्य बैठकी होत असत. कधी बाबा जानकीदासांबरोबर बोलत बसत, तर कधी बाबा जेथे असतील तेथे जानकीदास जात असत.

दामूअण्णा रासने यांचे चिरंजीव दत्तात्रेय यांनी जानकीदासांचा त्यांना आलेला अनुभव श्री नरसिंहस्वामींना सांगितला. त्यात ते म्हणतात.....

१९२० साली प्रतिकुल ग्रहांमुळे माझी प्रकृती फार बिघडली. मी जुन्नरपासून २ मैलांच्या अंतरावर असलेल्या उत्तरेश्वर मंदिरात जाऊन दर रविवारी शिवपूजन करीत असे. 'जानकीदास' नावाचे संत तेथेच रहात असत. त्यांना मी माझ्या पद्धतीप्रमाणे नमस्कार करीत असे. एकदा ते मला म्हणाले,

"तू एका महान सत्पुरुषाच्या छत्राखाली आहेस. माझ्यासारख्या क्षुद्र माणसाकडे का आलास ? माझ्यासारखे लोक साईबाबांचे पाय घट्ट धरतात."

त्यानंतर मी घरी जाऊन झोपलो असता फकिरी वेषात बाबांनी मला दर्शन दिले व म्हणाले,

"मला भिक्षा घाल; तुझ्या शरीराची मनासकट भिक्षा घाल !".....



## गंगागीर महाराज

गंगागीर महाराज हे एक महाप्रसिद्ध वैष्णववीर* होते. हे महाराजही वरचेवर शिरडीस येत असत.

विहिरीवरून दोन्ही हातांत पाण्याने भरलेल्या मातीच्या घागरी वाहून नेत असताना बाबांना पाहून गंगागीर महाराजांच्या मुखातून सहजपणे उद्गार निघाले, ''या शिरडीचे भाग्य थोर म्हणूनच शिरडीकरांना हे श्रेष्ठ रत्न लाभले. आज हा स्वतःच्या खांद्यावरून पाणी आणत असला, तरी ही बालमूर्ती सामान्य नाही. या भूमीचे पुण्य महान असल्यानेच ही मूर्ती या ठिकाणी अवतीर्ण झाली आहे.''

गृहस्थाश्रमी पुणतांबेकर असलेले हे महाराज एक संसारी पुरुष होते. त्यांना तालीमबाजी अतिशय प्रिय होती. एकदा कुस्ती खेळत असताना त्यांना एका सिद्धाची वाणी ऐकू आली, ''देवाबरोबर खेळ (क्रिया) करूनच हे शरीर झिजविले पाहिजे.'' जणू योग्य वेळची घटका आली. त्यांना एकदम वैराग्य आले. कुस्ती खेळता खेळता हे अनुग्रहरूप शब्द त्यांच्या कानी पडले मात्र, संसारावर पाणी सोडून ते परमार्थाला लागले.

पुणतांब्या**जवळ गोदावरी नदीच्या दोन प्रवाहांमधील बेटावर महाराजांचा मठ आहे.

श्रीमती भिकूबाई कोते यांनी १९०८ सालापासून आपले उर्वरित आयुष्य शिरडीसच साईचरणांपाशी व्यतीत केले. त्या नरसिंहस्वामींना आपला अनुभव सांगताना म्हणतात.....

वंजारगावच्या गंगागीर महाराजांनी शिरडीस मोठा नामसप्ताह केला होता. हजारो यात्रेकरू त्यानिमित्त शिरडीस येत होते. त्यात एक जथा संगमनेरचा होता. ते लोक जेव्हा संगमनेरला परत आले तेव्हा त्यांनी एक बाबांचा फोटो आणि बर्फीचा भरपूर प्रसाद देऊन मला सांगितले की, ''राधाकृष्णाआईने तुला शिरडीस बोलावले आहे.''

अशारीतीने मी शिरडीस आले.....

भिकूबाईंचे माहेर अहमदनगरचे. लग्नानंतर त्या संगमनेरास सासरी गेल्या; पण लवकरच विधवा झाल्या. राधाकृष्णाआईही लग्नानंतर लगेचच विधवा झाल्याने नगरला आपल्या आजोळी (बाबासाहेब गणेश हे त्यांचे आजोबा नगरला प्रसिद्ध वकील होते.) रहाण्यास आल्या असता तेथे त्यांची व भिकूबाईंची मैत्री झाली.

* वैष्णववीर (विष्णुभक्ती संप्रदायाचे अनुयायी)
** पुणतांबा (दौंड-मनमाड रेल्वेमार्गावरील एक गाव)

पंढरपुरला जाण्याचा रस्ता शिरडी गावावरून जात असल्यामुळे अनेक थोर सत्पुरुषांचे चरण या गावाला नेहमीच लागत.


❑❑❑

**संस्कृत व मराठीतील नाममंत्र, आरत्या व श्लोकांचा इंग्रजीतून अर्थ समजावून देणारी व इंग्रजी लिपीतून मूळ संस्कृत व मराठी उच्चारांच्या पठणाने निर्भेळ आनंद मिळवून देऊन नेमका परिणाम साधणारी, स्वतःसाठी व इंग्रजी जाणकारांस भेट देण्यास अत्यंत उपयुक्त अशी संस्थान प्रकाशित पुस्तकें :-**



Price : Rs. 15/-

*Śrī Sadguru Sāīnātha Sagunopāsanā*



Price : Rs. 22/-

**Shri Sainath Stavanamanjari**



Price : Rs. 4/-

*Śrī Sāī Bābā Astottaraśata Nāmāvalih*

# शेगावक्षेत्रीचे गजानन महाराज

(उत्तरार्ध)

डॉ. सौ. सुनन्दा खरडे, अमरावती

**अध्याय १४ - अ)** खर्ड्याचा (मेहकर) बंडूतात्या ! श्रीमंतीचा उपभोग व नातलगांची सरबराई यात मग्न. भक्ती नव्हती. कालांतराने कर्जापायी भिकेला लागल्यावर हिमालयात हरिद्वारी जाण्यासाठी राख फासून निघाला. तिकीट-घराजवळ ब्राह्मणरूपे महाराज भेटले. ''राख फासणे सोपे, वैराग्य निभवणे कठीण ! प्राण देशील तरी पुढल्या जन्मी अधोगती - हे स्मशानवैराग्य सोड ! म्हसोबाच्या पूर्वेस बाभळीखाली तीन फूट खोद !!'' मोहरा-रूपे-सोने त्याला लाभले व त्याने संसार सावरला. दरवर्षी शेगावी वारी करू लागला. यावरून महाराजांना दिव्यदृष्टी - अंतर्दृष्टी होती, याचेच हे प्रत्यंतर !



ब) सोमवती अमावास्येला ओंकारेश्वरी गेले. महाराजही सोबत होते. ''वेळ बरी नाही'', हे संतवचन ऐकले नाही. नावेला छिद्र पडले व पाणी आत शिरले. त्यावेळी साक्षात् नर्मदा गंगाभिल्लिणीच्या रूपाने आली व तिने परतीरी सुखरूप पोचविले. त्यावेळी संतवचन-महिमा व गंगादर्शनपुण्य हा अनुभव भक्तांना आला.

क) योगी माधवनाथांचे भक्त माळव्यातून शेगावी आले. त्यांना महाराज म्हणाले - ''तुमचे गुरु आत्ताच जेऊन गेले. तुम्ही विडा घेऊन जा !'' त्यावेळी भक्त विचारू लागले, ''आपली भेट कधी झाली?'' महाराज म्हणाले, ''ही 'योगांगे' आहेत. योगबले भेटी होतात.'' याप्रमाणे Tepepathy किंवा 'अंतर्ज्ञानाने हृदयसंवाद' होतो, ही अनुभूती भक्तांना आली व अत्यंत आनंद झाला.

**शेगावचे गजानन महाराज समाधिस्थ झाले तेव्हा, माझा भाऊ गेला म्हणून साईबाबांनी शोक व्यक्त केला. यावरून गजानन महाराज व साईबाबांचा आंतरिक संबंध व्यक्त होतो. अक्कलकोटचे स्वामी समर्थ, शेगावचे गजानन महाराज व शिरडीचे साईबाबा या त्रिमूर्तीला दत्तभक्तांमध्ये विशेष स्थान आहे. 'शेगावक्षेत्रीचे गजानन महाराज' या दीर्घ लेखाचा पूर्वार्ध सप्टेंबर-ऑक्टोबर, २००२च्या अंकात प्रसिद्ध झाला; या अंकात उत्तरार्ध...**

**अध्याय १५ - अ)** लोकमान्य बाळ गंगाधर टिळक स्वातंत्र्ययुद्धाच्या काळात वारंवार शेगावी गजानन महाराजांच्या दर्शनासाठी व आशीर्वाद घेण्यासाठी येत असत; कारण त्यांची गजानन महाराजांवर अतीव श्रद्धाभक्ती होती. एकदा अकोल्याला 'शिवजयंती' उत्सवासाठी सूज्ञ कार्यकर्त्यांनी गजानन महाराजांना अध्यक्षपदासाठी बोलावण्याचे ठरविले. त्यावेळी अण्णासाहेब पटवर्धन, दामले, खापर्डे, कोल्हटकर इत्यादी सहा विद्वान अनुकूल, तर इतर विरोधात बोलले. ''ते उघडे नाचतील, 'गिणिगिणी' म्हणत फिरतील. आम्हाला लाज वाटेल'' इत्यादी. त्यावेळी अंतर्ज्ञानाने गजानन महाराजांनी ओळखून नकार दिला. म्हणून टिळकांनी त्यांचे पाय धरले आणि आग्रहपूर्वक विनंती केली. म्हणून महाराज कबूल झाले व म्हणाले, ''अण्णा पटवर्धन हा नृसिंह सरस्वतीचा शिष्य, खापर्डे - कोल्हटकर तर कोहीनूरच !'' त्यानंतर टिळकांवरील प्रेमामुळे त्यांनी अध्यक्षपदावरून

दिलेल्या भाषणात सांगितले, ''सांभाळून बोलावे - कंकण (बेड्या) हाती येतील.'' खरेच, त्यानंतर टिळकांना पकडले व फाशीची शिक्षा झाली. तेव्हा कोल्हटकरांनी महाराजांची भेट घेऊन उपाय विचारला. हातातल्या भाकरीचा प्रसाद देऊन महाराज म्हणाले, ''बाळाच्या मुखी हा प्रसाद घाला!'' त्यानुसार मंडालेच्या तुरुंगात कोल्हटकरांनी तो प्रसाद टिळकांना दिला; आणि चमत्कार म्हणजे फाशीची शिक्षा रद्द झाली व 'गीतारहस्य' हा ग्रंथ तुरुंगात गुरुकृपेमुळे टिळकांनी ग्रथित केला. यावरून -

**''देव करी तरी काय न होई।**
**दगडाचिये नई तरी जेल ।।**
**फुटतील पाय चालतील भिंती।**
**मेरूमषक येती समतुका ।।''** - हीच गुरुकृपेची महानता लक्षात येते.

ब) मंदबुद्धी श्रीधर काळे (कोल्हापूर) महाराजांच्या दर्शनास नित्यनेमाने येई. महाराज म्हणाले, ''कोल्हापुरी ज्ञानसाधना कर!'' पुढे श्रीधर प्रिन्सिपॉल झाला. **''तमसो मा ज्योतिर्गमय''** अथवा -

**''अज्ञानतिमिरांधश्च। ज्ञानांजन शलाकया।**
**चक्षुरुन्मिलितं येन। तस्मै श्रीगुरवे नमः ।।''**

**अध्याय १६** - अ) मुंडगावला गजाननभक्त पुंडलिकाला एक बाई वेड्यात काढत म्हणाली, ''अंजनगावचे केजाजी महाराज यांना गुरु कर, मंत्र घे!'' पण पुंडलिक एकनिष्ठ! त्याला स्वप्नात दर्शन देऊन 'पादुका व मंत्र' महाराजांनी दिला व दुसऱ्या दिवशी दुपारी झामसिंगजवळ पादुका पाठविल्या. आजही त्या 'पादुकास्थानी' यात्रा भरते. पुंडलिक तेथे सदैव सेवेत होता. गुरुशिष्यांचे अंतर्मन एकरूप होते (Tepepathy), असा यातून अर्थ निघतो व गुरुशिष्यात ''इये हृदयीचे तिये हृदयी घातले'', असा 'हृदय संवाद' घडतो.

ब) राजाराम कंवर (अकोला) यांना दोन मुले! त्र्यंबक डॉक्टर होण्यास हैद्राबादला व गोपाळ अकोल्याला. एकदा त्र्यंबकला संतदर्शनाची ओढ लागली. कांदाचूनभाकर ही भावजयीने दिलेली शिदोरी महाराजांना देण्यासाठी घेऊन निघाला. गाडी तीन तास लेट! नंतर शेगावी चौथ्या प्रहरी पोचला तेव्हा महाराज पाटावरच बसलेले - ''काढ कांदा-भाकर-चटणी, आतापर्यंत उपाशी ठेवले'', असे म्हणाले. सर्वांनी त्र्यंबकची आर्तभक्ती ओळखली. गुरुने शिष्याला शांत केले. पुढे तो डॉक्टर झाला.

क) तुकाराम शेगोकर हा भक्त महाराजांना नेहमी चिलीम भरून देई. एकदा तो मळ्यात गेला तेव्हा सशाच्या शिकाऱ्याच्या बंदुकीची गोळी त्याच्या कानातून मेंदूत गेली. छर्रा मेंदूत घुसल्याने खूप त्रास होऊ लागला. तरीही संतसहवास सोडला नाही. नित्य अंगण झाडणे सुरूच! शेवटी संतकृपेने भोग सरल्यावर कानातून छर्रा बाहेर पडला व डोके शांत झाले. **''संत भोग भोगविती। कृपा करिती। सुजन संकटी तारिती ।।''** - हाच साक्षात्कार.

**अध्याय १७** - अ) अडगावच्या भास्करने अकोल्याहून आलेल्या विष्णूसाला परतवून महाराजांना मलकापूरच्या गाडीत बसविले. तेव्हा ते बायकांच्या डब्यात जाऊन बसले. मुख्य पोलिस इन्स्पेक्टर तारे आले. स्टेशनमास्तर म्हणाले, ''खटला भरा!'' पण तारे श्रद्धाळू भक्त. हे पाहून महाराज गाडीखाली उतरले. जेव्हा गाडी चालेना तेव्हा तारेंनी महाराजांना प्रणाम केला. गाडी चालू झाली. कोर्टात जठारसाहेबांना महाराजांनी चिलीम पेटवून मागितली. त्यांनी महाराजांना - 'विदेही योगी' यांना शिक्षा नाही, असे सांगून सोडले. पण भास्करला मात्र दंड केला. **(पापाय परपीडनम्)**

ब) महेताबअली व बच्चुलाल यांच्याकडे कुरुमला महाराजांनी एकत्र जेवण केले व त्याला पंजाबात पाठवून मुस्लिमांना शांत करविले. त्यांनी हिंदू-मुस्लिम ऐक्यभावना जोपासली होती.

क) बापूराव या भक्ताची पत्नी भानामतीने त्रस्त असताना महाराजांनी तिला दुरुस्त केली.

**अध्याय १८** - अ) मुंडगावची बायजा नावाची गजानन महाराजांची असमर्थ पतीकडे संसार करीत होती. तिला पुंडलिक भोकरे भक्त हा भाऊ शोभत होता. ही दोघे संतदर्शन-वारी करीत. पण लोकांना ते विपरीत वाटे. तेव्हा महाराजांनी भक्तांना दटावले व सांगितले, ''हे शुद्ध नाते, दूषित करू नका.'' यातून त्यांना भक्ताची पारख किती होती, हे कळते.

ब) राजाराम कंवरचा फोड जो अनेक औषधोपचारांनीही फुटला नाही तो फक्त महाराजांच्या तीर्थाने व अंगाऱ्याने फुटला. डॉक्टरांचे डॉक्टर असे हे गजाननबाबा ! त्यांचे तीर्थ व अंगारा हा आधिव्याधीनाशक आहे, हा अर्थ.

क) बापूना काळे हा अनन्य भक्त ! महाराजांबरोबर पंढरपुरला गेला. गर्दीत दर्शन होणार नाही म्हणून गजानन महाराजांनाच नमस्कार करून म्हणाला - "तुम्हीच माझे विठोबा. तुमच्या दर्शनाने मी धन्य झालो !"

**अध्याय १९** - अ) खामगावचा काशीनाथ हा निरिच्छ गजाननभक्त शेगावी दर्शनास गेला. "घरी जा, तार आहे आनंदवार्तेची", असे अचानक गजाननबाबा त्याला बोलले. खरेच 'बढतीची तार' होती. यातून महाराज किती साक्षात्कारी द्रष्टे होते, हे लक्षात येते.

ब) श्रीमंत गोपाळराव बुटी हे नागपुरला गजाननबाबांना आपल्या महालात घेऊन गेले. ऐश्वर्याचा थाटमाट व संतांची सेवा यातही महाराज उदास होते. शेवटी हरी पाटलाची आठवण करीत म्हणाले, "हरी आला"; व खरेच हरी पाटलाबरोबर शेगावी गेले. जाताना सौ. बुटींच्या सौजन्यशील भक्तीने संतुष्ट होऊन आशीर्वाद दिला, "सुखी भव !" येथे तुकोबांच्या निरिच्छ वृत्तीप्रमाणे "सोने आणि धन आम्हा मृत्तिकेसमान", ही अनुभूती महाराजांनी स्पष्ट केली.

क) एकदा रामटेकहून शेगावी जाताना सिद्धयोगी नृसिंह सरस्वती यांची भेट घेऊन गजाननबाबा तृप्तीने आनंदले. म्हणाले, "मोठा बंधू गाणगापुरी आहे. त्याच्या भेटीचेही आमंत्रण मिळाले आहे."

ड) आत्माराम वेदाध्ययनी यांनी एकदा वेदमंत्र चुकीचा म्हटल्याबद्दल महाराजांनी चूक दुरुस्त केली. त्यामुळे उपरती होऊन त्यांनी काशीहून शेगावी स्थलांतर केले आणि सर्व इस्टेट महाराजांना अर्पण केली.

## अवतारसमाप्ती

श्रावणमासात पंढरपुरी जाऊन विठुरायाला म्हणाले, "आता अवतार संपवतो." शेगावला परतल्यावर भाद्रपदी गणेश चतुर्थीला भक्तमंडळींची घरोघरी जाऊन भेट घेतली. "आता अवतारकाळ संपला", असे सांगितले व ऋषिपंचमीस मिठाने पूर्वनियोजित समाधिस्थान भक्तांकरवी भरून समाधी घेतली. भजन-गजरात शिळा लावली. त्यांनी समाप्तीची तिथीही स्वतः निश्चित केली होती. या युगातील विदर्भऋषीने ऋषिपंचमीस अवतार समाप्त केला. ८.९.१९१० रोजी सकाळी ८ वाजता ते समाधिस्थ झाले. त्यानंतर रामचंद्र पाटील यांच्याकडे अतिथीरूपाने जाऊन भोजन केले व दक्षिणा म्हणून देवस्थानाची प्रामाणिक देखरेख करण्याचे वचन घेतले. त्याप्रमाणे आजवर पाटीलमंडळी प्रामाणिकपणे मठमंदिराची सर्वांगीण देखरेख करीत आहेत.

## 'शेगाव' तीर्थक्षेत्राची भरभराट

**संत हेच भूमिवर। चालते बोलते ईश्वर।**
**वैराग्याचे सागर। दाते मोक्षपदाचे ॥**
**संत हे सन्नीतीची। मूर्ति होय प्रत्यक्ष साची।**
**संत भव्य कल्याणाची। पेठ आहे विबुध हो ॥**

(गजानन विजय, प्रस्ता. वि. ल. सुबंध)

श्री. बा. ग. खापर्डे 'गजानन विजय'च्या (दासगणूविरचित) प्रस्तावनेत म्हणतात - "उन्मत्त - पिशाच्च व बाल या योग्याच्या तीन वृत्तींपैकी बालवृत्ती त्यांच्या अंगी बाणलेली होती. इहलोकाच्या विकारापासून ते लेकराप्रमाणे सर्वथैव निर्लेप होते. ... साईबाबांची व महाराजांची वृत्ती समसमान होती... ज्या दिवशी शेगावी महाराजांनी देह ठेवला त्या दिवशी साईबाबा दिवसभर शोक करीत होते व ज्या क्षणी त्यांनी समाधी घेतली त्या क्षणी **'माझा जीव चालला, मोठा जीव चालला'** म्हणत ते गडबडा लोळले व विव्हळले, असे आमचे वडील (श्री. कै. दादासाहेब) सांगत असत."

## संत गजानन महाराज संस्थान, 'शेगाव'चा अल्प परिचय

संतश्रेष्ठ श्री गजानन महाराजांच्या मंगलमय वास्तव्याने शेगाव पुनीत झालेले श्रींच्या अलौकिक शक्तीचे हे प्रभावी शक्तिपीठ बनले आहे. समृद्धीची गंगा, सौजन्याची यमुना व सात्त्विकतेची सरस्वती यांचा त्रिवेणी संगम शेगावच्या

पावन तीर्थात झाला आहे. शेगाव हे सध्या 'भूवैकुंठ' झालेले आहे. सत्संगाचे ते 'विद्यापीठ' बनले आहे, संतसान्निध्याने ते 'सिद्धपीठ' ठरले आहे व नामघोषाने हे प्रति-पंढरपूर झाले आहे. "**सर्वे भवन्तु सुखिनः**" हे या संस्थानचे ब्रीदवाक्य आहे.

## संस्थानचे आजचे विशाल स्वरूप

बीजामधून एखादा प्रचंड वटवृक्ष तयार व्हावा व पुढे त्या वटवृक्षाला प्रचंड पारंब्या फुटाव्यात, तसेच आज हे संस्थान सर्वांगांनी बहरले आहे. लोकशिक्षण, जीवसेवा, रुग्णसेवा, शैक्षणिक सेवा, भक्तसेवा, संतसेवा इत्यादी महनीय कामगिरी 'श्री' करवून घेत आहेत. तिचा धावता आढावा असा -

**आध्यात्मिक कार्य** - येथे 'वारकरी शिक्षणसंस्था' वै. मामासाहेब दांडेकरांच्या शुभहस्ते सुरू झाली व अध्यात्माच्या भक्तीत रंगलेले भक्त निर्माण होऊ लागले.

**उत्सव** - दरवर्षी श्रींचा प्रगट दिन, रामजन्मोत्सव व श्रींची पुण्यतिथी हे मोठ्या प्रमाणात विद्युत रोषणाईने आणि अश्व, गज, रथ, मेणा, पालखी, दिंडी आदि वैभवासह मिरवणुकीने सुसंपन्न होतात. श्री गजानन विजय (दासगणूविरचित) ग्रंथाच्या मराठीत ३६ आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत. तसेच, हिंदी, इंग्रजी, गुजराथी, कानडी, तेलुगु या भाषांमध्येही अनुवाद झालेला आहे. आधुनिक महिपती दासगणू महाराजलिखित हा ग्रंथ संस्थेचा अधिकृत ग्रंथ म्हणून भक्तांना मान्य झालेला आहे व आतापर्यंत एकूण ग्रंथसंख्या ८,८२,००० झालेली आहे.

**वास्तुविस्तार** - 'भक्तनिवास' ही भव्य वास्तु अल्पमूल्यात भोजननिवासासह १ ते ६ क्रमांकांच्या इमारतीत आहे. दोन भव्य मंगल कार्यालये - ९० + ९० व १०० + १००ची, तसेच ९० + ९५चा प्रवचन हॉल अत्यंत सुशोभित आहे. एकाच वेळी ६०० लोकांची भोजनव्यवस्था येथे होते. रोजचा महाप्रसाद ११.३० ते १ वाजेपर्यंत मिष्टान्नासह दररोज ५००० भक्तांना लाभ मिळतो. यात्राकाळात ७०,००० ते १,००,०००पर्यंत भक्त लाभ घेतात.

**संस्थानची पंढरपूर शाखा** - ८.५ एकर जागेत पांढऱ्या शुभ्र संगमरवरी दगडात बांधलेले मंदिर ४ भक्तनिवासांसह रम्य परिसरात आहे.

गानकोकिळा श्रीमती लता मंगेशकर व उषा मंगेशकर यांच्या सुस्वरातील आरती, भूपाळी इत्यादींच्या रेकॉर्डस्, विविध फोटो, तसेच श्रींच्या जीवनावरील रंगीत लघुचित्रपट व व्हिडिओ कॅसेट्स हिंदी, तेलुगु व कानडी भाषेत उपलब्ध आहेत.

**पायी वारी** - १९६८पासून श्रीक्षेत्र पंढरपूर व १९७६पासून श्रीक्षेत्र आळंदीला, शिवाय त्र्यंबकेश्वर, पैठण, मुक्ताबाई, उज्जैन, माणिक प्रभूमहाराज येथेदेखील संस्थानच्या पालख्या गेल्या आहेत. आषाढीला (पंढरपुरास), कार्तिकीला (आळंदीस) ५०० ते ६०० वारकरी दरवर्षी निघतात. बनारसहून चांदीची पालखी करवून घेतली आहे. दिंडीमुळे विवेक-वैराग्य-भक्ती-ज्ञानासह तीर्थयात्रा घडते.

**शेगावी दर्शनार्थी** - दररोज सरासरी १०,००० भक्त येतात. हे इलेक्ट्रॉनिक्स गणकयंत्राद्वारे कळते. ६१ फूट उंचीचा मंदिराचा चांदीचा ध्वजस्तंभ संस्थानची आध्यात्मिक उंची दाखवतो.

**वैद्यकीय क्षेत्र** - अल्पमूल्यात रुग्णसेवा हे उद्दिष्ट ठेवून 'शिवभावे जीवसेवा' केली जाते. होमिओपॅथिक, आयुर्वेदिक, ॲलोपॅथिक, अपंग युनिट, फिजिओथेरपी, पॅथॉलॉजी इत्यादी विभाग कार्यरत आहेत. १९७४ ते मार्च २०००पर्यंत संस्थानमधून ॲलोपॅथी - ४८,६६,४५९ रुग्णांनी, १९६३पासून मार्च २०००पर्यंत आयुर्वेदिक १२, ५२, ४०४ व होमिओपॅथिक १९७३ ते मार्च २००२पर्यंत २४,८२,८०२ रुग्णांनी औषधोपचार घेतले आहेत. रुग्णवाहिका सिद्ध आहेत. नेत्रदान शिबिरे अखंड सुरू आहेत. आतापर्यंत १३,०७३ रुग्णांना दृष्टीलाभ झाला आहे, चष्मेदेखील मिळाले आहेत. ८० अपंग रुग्णांना कृत्रिम अवयववाटप व शिबीर-खर्च संस्थानने केला आहे. मतिमंद मुलांचे वसतीगृह - कुष्ठरोग्यांना धोतर-साडीवाटप झाले आहे. ग्रामीण फिरते रुग्णालयही श्रीक्षेत्र नागझरी, लोहारा, काळखेड, कळंबा, चिंचोली, जानोरी इत्यादी ठिकाणी कार्य करते. आदिवासींसाठी रुग्णालये व कपडे-धान्यवाटप योजना, सातपुड्यात छोट्या गावात

आदिवासी आश्रमशाळाही आहेत. दरवर्षी १ लाख रुपयांचे कापडवाटप होते.

**शैक्षणिक कामगिरी** - १९.४.८३ रोजी संत गजानन शिक्षण संस्था पंजीबद्ध झाली व ३१.५.८३ रोजी संत गजानन अभियांत्रिकी महाविद्यालय निघाले. बालपणीच सूर्यमंडळ गिळायला निघालेल्या हनुमंताप्रमाणे हा प्रचंड प्रकल्प उदयास आला व श्रींच्या कृपेने पहिल्याच वर्षी येथील विद्यार्थी विद्यापीठात प्रथम आला. ४ प्रचंड वसतीगृहे, अभियंत्रांची भव्य वास्तु, उत्कृष्ट ग्रंथालय, अद्ययावत यंत्रसामग्री, कुशल व शिक्षणप्रेमी प्राध्यापकांमुळे उत्तरोत्तर विकासाचा उच्चांक गाठत आहे.

**गजानन वाटिका** - शेगावचे हे निसर्गरम्य स्थळ स्टेशनपासून ४ फर्लांगावर असून ते 'मिनी वृंदावन' (म्हैसूरच्या वृंदावन गार्डनसदृश्य) म्हणून ओळखले जाते. संस्थानच्या सेवार्थ बसेस भक्तांना मंदिरापासून वाटिकेपर्यंत ने-आण करतात. तेथे मधोमध श्रींची मूर्ती, तीवर कारंजातून जलधारांचा वर्षाव, रंगीत दिव्यांची रोषणाई - उंटगाडी - कपबशी - बाळगाडी कॉइलगेन - झोपाळे इत्यादीने हे उद्यान नयनरम्य झाले आहे.

**आनंद सागर** - (तलावाचे सौंदर्यीकरण) शेगावनगरीचे आकर्षण ठरू शकेल असे श्री गजानन संकुल उभारण्याचा संकल्प असून या प्रकल्पांतर्गत तलावाचे सौंदर्यीकरण, मनोरंजन केंद्र, भक्त - सेवकांची वसाहत, विविध घाट, विद्युतीकरण व वृक्ष लावण्याचा मानस आहे. या प्रकल्पासाठी अंदाजित खर्च ५०१ लाख रुपये अपेक्षित आहे. एस्सेल वर्ल्डसारखा हा प्रकल्प असेल.

याशिवाय स्वामी विवेकानंद ध्यान केंद्र, श्री साधनास्थळी (निसर्गसान्निध्यात ईश्वरसाक्षात्कार, शांती आणि आनंदलाभासाठी) कुटी बांधण्याचा संकल्प आहे.

आर्ट गॅलरी, मातृसेवा संघ इत्यादी असंख्य योजना आहेत. संस्थेच्या शाखा पंढरपूर, आळंदी, त्र्यंबकेश्वर, कपिलधारा, ओंकारेश्वर, गिरडा इत्यादी ठिकाणी आहेत.

अशी ही सद्गुरु गजानन महाराजांची शेगावनगरी आज महाराजांच्या कृपादृष्टीच्या विविधांगी उपक्रमांमुळे स्वर्गतुल्य वैकुंठभुवन झालेली आहे. आनंदवनभुवनाचे साक्षात् दर्शन येथे घडते. अशा संताच्या भव्यदिव्य कार्यशक्तीचे मर्म पुढील शब्दांतच कळू शकते -

**तैसी दशेची वाट न पाहता।**
**वयसेचिये गावा न येता।**
**बालपणीच सर्वज्ञता। वरी तयाते ॥**
**तिये सिद्धप्रज्ञेचेनि लाभे। मनचि सारस्वते दुभे।**
**मग सकल शास्त्रे स्वयंभे। निगती मुखे ॥**

अशा सिद्धयोगी साक्षात्कारी संताला विनम्र प्रणाम !

❑❑❑

**वदे दोघांमाजील एक। घांटचि माझा मूळ मुलूख। परी त्या समुद्रपट्टीचा देख। होता अन्नोदकसंबंध॥ तदर्थ गेलों गोमांतकांत। नोकरी मिळवावी आलें मनांत। आराधिला तत्प्रीत्यर्थ दत्त। नवसिला अत्यंत आदरें॥ देवा कुटुंबरक्षणार्थ। नोकरी करणें आहे प्राप्त। तरी होऊनि कृपावंत। देईं ती, लागत पायांस॥ अद्यप्रभृति अल्पावकाशीं। तरी तूं निजब्रीद राखिशी। प्राप्ती जी होईल प्रथम मासीं। समग्र तुजसी अर्पीन॥ भाग्यें दत्त प्रसन्न झाला। अल्पावकाशीं नवसा पावला। रुपये पंधरा पगार मजला। मिळूं लागला आरंभीं॥ पुढें साईबाबांनीं वर्णिली। तैशीच माझी बढती जाहली। सय नवसाची समूळ बुजाली। ती मज दिधली ये रीती॥ कोणास वाटेल घेतली दक्षिणा। दक्षिणा नव्हे ती फेडिलें ऋणा। दिधलें येणें मिषें मज स्मरणा। अत्यंत पुराण्या नवसाचे॥**

**- अध्याय ३६, श्री साईसच्चरित**

# आराधना विधी

- प्रा. अजित कुलकर्णी



**दसरा हा साईबाबांच्या पुण्यतिथीचा दिवस. दसरा उत्सवात बाबांचे श्राद्ध 'आराधना विधी' करून साजरे केले जाते. हा आराधना विधी यतीच्या श्राद्धानिमित्त केला जातो. त्या विशेष विधीविषयी -**

**स**बंध विश्वातील प्राचीन संस्कृती म्हणजे भारतीय संस्कृती, असे म्हणता येते. त्यात मानवी जीवनाची हळुवारपणे उकल केलेली आहे. तसे पाहता, भारतीय संस्कृती म्हणजे वैश्विकता व सत्याचे प्रयोग आहेत. यात जसे व्यक्ताबद्दल अधिकतम विचार आहेत, तसे अव्यक्ताबद्दलही विचार सांगितले आहेत. यामध्ये प्रत्येक मनुष्याची निश्चित कर्तव्येही सांगितली आहेत. हे विचार खरोखरीच वाखाणण्याजोगे आहेत.

वृद्धपणी मातापित्यांना मुलांनी विचारणे, हे जितके महत्वाचे आहे, तितकेच मृत्यूनंतरही माता-पित्यांचे श्राद्ध करणे महत्त्वाचे आहे, तसे कर्तव्यच आहे, हे शास्त्रकार आग्रहपूर्वक सांगतात. त्यातील एक भाग असा की, आयुष्यभर माता-पित्यांचे ऋण विसरता कामा नये; कारण त्यांच्या त्यागातूनच आपले जीवन आकार घेत असते. त्या कृतज्ञतेच्या भावनेने प्रथम श्राद्ध हे केले पाहिजे. त्यानंतर जड-स्थूल देह पडल्यावर सूक्ष्म देहादि जीवअवस्थेला गती मिळण्यासाठी पुत्रांनी करावयाचे कर्म आहे. मनुष्याचे ज्या तिथीला निर्याण होते त्या तिथीला करावयाच्या कर्माला 'श्राध्द' म्हणतात.

या कर्माचे (श्राध्द) तीन भाग आहेत.

(१) **सामान्य माणसाचे श्राध्द**

(अ) भोजनादि, विधिवत

(आ) चटावर किंवा हिरण्यकानी

(२) **संतांच्या तिथीला 'पुण्यतिथी' म्हणतात.** त्यांचे कोणी आप्त वा गोत्रातील व्यक्ती हा विधी करतात किंवा त्या दिवशी देवास अभिषेक, ज्ञानेश्वरी आदि ग्रंथाचे वाचन, पारायण, वीणावादन, नामसंकीर्तन करून साजरा करतात.

(३) **यती अथवा संन्यासी जेव्हा देह ठेवतात, त्या तिथीला करावयाच्या विधीला 'यती-आराधना' म्हणतात.**

या लेखातून 'यती-आराधने'बद्दल आपण मागोवा घेणार आहोत.

**या विधीसाठी साहित्य :-**

(१) हळद (२) कुंकू (३) गुलाल (४) रांगोळी

(५) समई (६) निरांजन (७) उदबत्त्या (८) कापूर (९) काडेपेटी (१०) तांदूळ - १ कि. (११) सुपाऱ्या - २० (१२) विड्याची पाने - ५० (१३) नारळ - ३ (१४) सुटी सुगंधी फुले (१५) दुर्वा, बेल, तुळशी (१६) केळीची पाने - जेवण्यासाठी (१७) सोवळ्यात स्वयंपाक (१८) गोविंद विडे - ७ (१९) सोवळे - नेसण्यासाठी (२०) आसने - प्रत्येकास बसण्यासाठी (२१) पाट - किमान २ (२२) ताह्मन - २ (२३) पळी भांडे (२४) पंचामृत (२५) अत्तर (२६) गरम पाणी (२७) पाय धुण्यासाठी तसराळे (२८) आंब्याचा डहाळा

**यती-आराधना करण्याचा अधिकारी आणि ब्राह्मण-योजना :-**

यतीची आराधना त्याचे शिष्य किंवा त्याच्या (असल्यास) पूर्वाश्रमीचे पुत्र करू शकतात. याचे अधिकारी केवळ गृहस्थाश्रमीच असतात.

उदा. एखाद्या यतीला आपल्या यतीगुरुची आराधना करावयाची असल्यास त्याने ही आराधना एखाद्या गृहस्थाकडून करून घेणे आवश्यक असते.

या विधीसाठी ज्या पक्षात (पंधरवड्यात) यती देह ठेवतात त्यानुसार ब्राह्मण - योजना असते.

शुद्ध पक्षात यतींनी देह ठेवला असल्यास २४ ब्राह्मण सांगणे, संध्येतील २४ नावांप्रमाणे, त्यांना 'क्षण' देणे, आवाहन, अर्घ्य, पाद्य-पूजन करणे. इतके ब्राह्मण मिळाले नाहीत, तर प्रत्येकाला तीन क्षण देणे व ८ ब्राह्मण सांगणे.

यतींनी दुसऱ्या पक्षात देह ठेवला असल्यास 'संकर्षण' नामापासून, म्हणजे १२ ब्राह्मण सांगणे अथवा प्रत्येकास तीन क्षण देऊन ४ ब्राह्मण सांगणे.

याशिवाय हा विधी चालविण्यासाठी एक स्वतंत्र ब्राह्मणाची योजना असते.

**बैठकव्यवस्था व पूजाविधी :-**

पूर्वेकडे तोंड करून ब्राह्मण बसण्याची व्यवस्था करावी. प्रथम यजमानांनी ब्राह्मणांना समंत्रक अर्घ्य - पाद्यपूजन करावे. गरम पाणी घेऊन त्यात कापूर, गंध, अक्षत टाकावे. या पाण्याने सपत्नीक यजमानाने ब्राह्मणांचे पाय धुवावेत. पत्नीने पाणी घालावे आणि पतीने पाय धुवावेत व पुसावेत. ते पाणी एका कलशात ठेवावे. त्यानंतर भोजनपात्रं मांडावीत. त्यांवर तुळशीपत्राने पात्रांत तूप वाढावे. मग पदार्थ वाढण्यास प्रारंभ करावा. त्यावेळी त्रिसूपर्णादि सूक्ते म्हणावीत. पाने वाढताना देवाचा, सदरहू यतीचा, तीर्थराजाचा व गोग्रास असे नैवेद्य प्रथम वाढून ब्राह्मणांची पाने वाढावीत. अन्न वाढून झाल्यावर देवाचे पान, यतीचे पान व गोग्रासाचा नैवेद्य समर्पण झाल्यावर ब्राह्मणांच्या हातांवर आपोशन देऊन प्रार्थना करावी, ''जे पदार्थ आवडतील ते घ्या व नको असतील ते बाजूला करून सुखाने भोजन करा !''

मग ब्राह्मण-भोजन प्रारंभ करावे. त्यावेळी इतर ब्राह्मणांनी यतीची उपनिषदे वा सूक्ते म्हणावीत. सर्वांचे भोजन झाल्यावर उत्तर आपोशन द्यावे. येथे पहिला विधी संपतो.

**तीर्थराजाची पूजा :-**

ब्राह्मण-भोजन झाल्यावर तीर्थराजाची पूजा करावी. प्रथम चौरंगावर तांदूळ ठेवून त्यावर पाणी ठेवलेला कलश ठेवावा. त्या तांब्यात गंध, अक्षत, फुले समंत्रक वाहावीत. त्यावर आंब्याचा डहाळा व एक नारळ ठेवावा. त्यानंतर कलश यजमानांनी आपल्या मस्तकावर धारण करून कलशातील पाणी अंगावर पडेल असे नृत्य करावे. त्यावेळी इतर ब्राह्मण भृगुवल्लीचे अनुवाक म्हणत असतात.

त्यानंतर जो तीर्थराजाचा नैवेद्य ठेवलेला असतो तो समर्पण करावा. नंतर उपास्य यतीची आरती करावी. सर्वांना कलशातील तीर्थ द्यावे व सर्वांनी प्रसाद ग्रहण करावा. ब्राह्मणांचा आदर-सत्कार करावा.

**फलश्रुती :-**

ऋषी असे म्हणतात, याचा प्रसाद सर्वांनी घ्यावा. यावेळी दर्शन घ्यावे. शक्य असेल त्यावेळी यतीनेही जरूर उपस्थित रहावे. हा विधी केवळ गृहस्थाश्रमी व्यक्तीनेच करावयाचा असतो. स्त्रियांनी हा विधी जरूर पहावा व प्रसाद ग्रहण करावा.

□□□

# अमृत कलश

('साईलीला'च्या जुन्या अंकांतील अनुभव) संग्राहक : सुभाष जगताप



## ''अण्णाने काकीला बुडविली''

**श्री** साईबाबा हे नावही मला माहीत नव्हते. इ.स. १९१२त मी माझे वडिलांच्या घरी देवघरात पूजा करीत होते. मला मुख्य उपासना रामाची होती. परंतु पूजेत रामाबरोबर हनुमानाचीही मूर्ती होती. पूजा झाल्यावर पुढील माडीवर झोपाळा होता तेथे आले. समोर जांभळीच्या झाडावर एक तेजस्वी माकड दिसले. ते लगेच खिडकीत आले व क्षणांत नाहीसे झाले. रात्री स्वप्न पडले त्यात साईबाबा आले व म्हणाले, शिरडीत तुझा राम आहे, तू तेथे ये. माझे गुरूंनी मला शिरडीची माहिती दिली. १९१३ साली शिरडीस गेले. तेथे बाबांना पाहिले व स्वप्नातील मूर्ति ती हीच याची खात्री झाली. तेव्हापासून बाबा समाधिस्थ होईपर्यंत दरसाल मी दर्शनाला जात असे. १९१७साली दुपारची आरती झाल्यावर व जेवणानंतर मला माझ्या शेताबद्दल बाबांना विचारावे असे मनात आले. स्वतः विचारण्याचे धैर्य होईना, म्हणून रा. माधवराव देशपांडे यांस, तुम्ही माझे शेताबद्दल बाबांना विचारा, असे सांगितले. ते म्हणाले, आपण विचारावे. मी मशिदीत आले तो बाबा वाण्याला शिव्या देत होते. शिव्या फार अस्सल होत्या. बाबा लाल झाले होते. मी दूर उभी राहिले. दहा मिनिटांनंतर मी बाबांच्या जवळ जाऊन बसले. रा. अण्णा चिंचणीकर जवळ होते. ते बाबांचे पाय दाबू लागले. रा. जोगही आले. बाबा म्हणाले, ''अण्णाने काकीला बुडविली. सफाई वाटोळे केले. मला तरास लई दिला.'' अण्णा चिंचणीकर जोगांस म्हणाले, मी कोणाचे घेतले नाही व कोणास बुडविले नाही, बाबांना त्रास कधी दिला नाही. बाबांनी मजकडे पाहिले व मला वर बोलाविले. मला पाय चेपण्यास दिला व पाठीवर हात फिरविला आणि म्हणाले, ''काकी, खाऊ दे ग. अण्णाच खातो ना ? फिर्याद करू नको. अल्ला आपणास देईल. कमी करणार नाही. तू, मी व अण्णा नाशिकास राहू.'' माझ्या बापाचे नांव अण्णा. माझ्या सावत्र आईचे व माझे जमेना. मला पोटगीकरिता सासऱ्याने जमीन दिली होती. ती बाप देईना व घरी ठेवीना, म्हणून फिर्याद कर असे काही लोक म्हणत. बाबांच्या आज्ञेप्रमाणे ही फिर्याद केली नाही. मला प्रथम त्रास झाला. नंतर मी नर्स मिडवाईफची परीक्षा पास झाले. बाबांनी सांगितल्याप्रमाणे अल्ला देत आहे व कमी पडत नाही.

**- लक्ष्मीबाई ठुसे**

❑❑❑

## ''अरे अल्ला अबी बरसात पुरा कर''

**इ.** स. १९१० मेच्या अखेरीस मी शिरडीस पहिल्याने गेलो. प्रथमदर्शनीच कोणातरी सिद्धपुरुषासमोर मी उभा आहे असे माझे मनात आले. पहिली भेट फारच आनंददायक होती. मी परत जाण्याबद्दल बाबांना विचारताच त्यांनी असे उद्गार काढले की, ''आपण काय रानांत आहोत ? चार-दोन रोजांनी जाऊ.'' पहिल्या प्रथम ७-८ दिवस ठेवून घेतले. त्या खेपेस दुसऱ्या दिवसापासून बाबा माझ्याकडे पाहून म्हणत की, माझे अर्धांग दुखत आहे. ते निर्जीव झाले आहे. काही हरकत नाही. अल्लामिया ह्यातून बरे करील. त्या बोलण्याचा त्यावेळेस मला बोध

झाला नाही. शिरडीहून परत आल्यावर असे दिसले की, बाबा बोलत होते त्याच दिवसापासून माझी मातोश्री अर्धांगवायूने फार आजारी होती. मी मुंबईस पोहोचलो त्याच क्षणी बाबांच्या पायांचे तीर्थ व त्यांची उदी मातोश्रीस दिल्याबरोबर तिच्या दुखण्याचे भयंकर स्वरूप बदलून गेले व तिच्याविषयी काळजी करण्याचे काहीच कारण नाही अशी सर्व मंडळींची खात्री झाली. ती त्या दुखण्यातून बरी झाली व त्यानंतर १॥ वर्षांनी शिरडीस जाऊन बाबांच्या दर्शनाचा लाभही घेऊन आली. वरील हकीगतीवरून बाबा कसे सर्वज्ञ व सर्वसाक्षी होते व त्यांच्या उदीत व चरणतीर्थात काय शक्ती आहे, त्याची खूण मला पक्की पटली.

रा. नानासाहेब चांदोरकर यांचे दोन्ही पुत्र व मी असतांना बाबा त्रयोदशाक्षरी राममंत्राचा उच्चार करू लागले. काही वेळ स्वतः तोंडाने मंत्रोच्चार केल्यावर मजकडे पाहून म्हणतात की, काय बोलत असावे रे ? त्याच दिवशी बाबांनी हांडी स्वतः शिजविण्यास चढविली. बाबांनी सर्व मंडळीस बाहेर घालवून दिले व नानासाहेबांचे बापूस, बाबूस व मला अशा फक्त तिघांस जवळ राहू दिले. ती हांडी शिजत असतांना पाहाण्याची मौज वाटे. बाबांनी पुन्हा गुणगुणल्यासारखा मंत्रोच्चार केला, व मजकडे रोखून स्पष्ट म्हणू लागले, "काय रे, काय म्हणावे? श्री राम जय राम जय जय राम." एवढे म्हणताच माझे सर्व शरीर झोपेतून जागे व्हावे त्याप्रमाणे होऊन मी बाबांच्या पायांवर मस्तक ठेवले. माझे प्रेमाश्रू श्रींच्या पायांवर पडले. बाबा गप्प राहिले. चांदोरकरांच्या बापूने मला विचारले की, "बाबांच्या पाया का पडला ?" मी त्यास सांगितले की, काही वेळाने सांगेन. बाबांनी मला माझ्या दीक्षेची जाणीव देऊन तिची रात्रंदिवस कशी जागृती असावी ह्याची मला सूचना दिली. हा सर्व प्रकार किती कौतुकाने बाबांनी केला हे पाहून त्या दोघां मुलांस फार आनंद वाटला. त्या ७ ते ८ दिवसांच्या दरम्यान ठिकठिकाणचे रंजलेले गांजलेले लोक शिरडीत बाबांजवळ येत होते ते आम्ही पाहिले. त्या सर्वांची निगा बाबा आपल्या मुलांप्रमाणे करून त्यांची रवानगी कशी करीत असत हेही आम्ही पाहात असू.

या पहिल्या भेटीत एकदा दुपारच्या वेळी बाबा जवळ असतांना एकाएकी आकाश भरून आले व दहापंधरा मिनिटांत जोराचा पाऊस पडू लागला. पाऊस पडतेवेळी माझ्या मनात असे आले की, घरून एकदोन दिवसांच्या बोलीने मी तेथे आलो व बाबा तर घरी जाण्याची परवानगी देत नाहीत. पाऊसही जोराचा सुरू झाला. नदीला आता नाव असेल, पण परत जातेवेळी काय स्थिती होईल कोण जाणे, असे प्रापंचिक विचार माझ्या मनात येत आहेत तोच बाबा आकाशाकडे पाहून म्हणतात, "अरे अल्ला अबी बरसात पुरा कर. मेरे बाल-बच्चे घर जानेवाले है, उनकू सुखसे ज्याना दे." असे बोलतांच पाऊस हळूहळू कमी झाला व तत्क्षणी माझ्या मनाची खात्री झाली की, आपले अंतस्थ विचार बाबांस त्वरित कळतात. अर्थात परत येतेवेळी पंजाब मेल मिळणे अगदी अशक्य होते. तरी ती मेल त्याच दिवशी लेट होऊन आम्हास मनमाडास मिळाली व आम्ही फार सुखात प्रवास करून त्वरित मुंबईला आलो.

आम्ही शिरडीस जाऊ लागल्यापासून आमच्यापैकी काही आप्तवर्गात चिकित्सा होऊ लागली की, काय हे लोक हिंदूंचे देवधर्म सोडून मुसलमानाच्या नादी लागले आहेत. त्यांच्या पाया काय पडतात सदोदित. बाबा बाबा काय करतात. अशी आमच्या पश्चात निंदेची सुरवात झालीच होती. अशी बाबांची खरी जाणीव न झालेल्यांपैकी एक बाई आम्हाकडे राहावयास आली होती. तिने आमच्या येथे रात्री स्वप्नात आमच्या ओटीवरून आमचे देवघरांत एक पांढरी कफनी घातलेला फकीर जातांना पाहिला व स्वप्नातच विचार करू लागली की, हा फकीर एकदम असा यांचे देवघरांत कसा शिरला ? म्हणून ती देवघरांत गेली. पाहाते तो वे. शा. सं. तेलंगी महादेव भटजी देवाची पूजा आटोपून बाहेर निघून गेले. स्वप्नात ती बाई विचार करते की, मी मुसलमान फकीर आंत जातांना पाहिला व तोच इसम बाहेर पडतांना मला पूज्य ब्राह्मण कसा दिसला ? व लगेच ती बाई जागी झाली व स्वप्न सर्वांस सांगू लागली. स्वप्नाचा अर्थ का करावयाचा याची गरज नाही. संतांचे जे प्रेम भक्तांवर तेच इतरांवर कसे असते त्याचा हा स्पष्ट दाखला आहे.

**– रा. ब. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान**

□□□


# अपूर्व योगाची श्री साई पुण्यतिथी भक्तिभावाच्या उदंड उत्साहात साजरी

विजयादशमी हा शिरडीच्या श्री साईबाबांच्या पुण्यतिथीचा दिवस. ''सबका मालिक एक है'', हा महान संदेश देणाऱ्या श्री साईबाबांच्या या वर्षीच्या पुण्यतिथी सोहळ्यास अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले होते. तब्बल चौऱ्यांशी वर्षांनंतर प्रथमच श्री साईबाबांनी समाधी घेतल्याची भारतीय तिथी आणि इंग्रजी तारीख व वार जुळून आल्याने श्री साईबाबा संस्थानने या सोहळ्याची जय्यत तयारी केली होती. सुमारे एक लाख भाविकांनी मुख्य सोहळ्याच्या दिवशी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. भक्तिमय उदंड उत्साह भरलेल्या वातावरणात या सोहळ्याचे चार दिवस शिरडीकरांना व साईभक्तांना कसे गेले ते समजलेच नाही.


श्री साईबाबा संस्थानचे अध्यक्ष, विश्वस्त, कार्यकारी अधिकारी आणि संस्थानचे पदाधिकारी व कर्मचारी यांनी हा सोहळा यशस्वीरीत्या पार पडण्यासाठी कल्पक नियोजन करून अथक परिश्रम घेतले. उत्सवाची सुरुवात १४ ऑक्टोबर रोजी पहाटे परंपरागत पद्धतीने झाली. श्री साईसमाधी मंदिरावर व परिसरात करण्यात आलेली कलात्मक लख्ख विद्युत रोषणाई साईभक्तांचे लक्ष वेधून घेत होती. पहाटे ५.४५ वा. श्रींची प्रतिमा, वीणा व पोथी यांची शोभायात्रा काढण्यात आली. संस्थानचे अध्यक्ष श्री. द. म. सुकथनकर यांनी पोथी, विश्वस्त श्री. भास्करराव बोरावके यांनी वीणा, तर विश्वस्त श्री. मधुकर दंडवते यांनी श्रींची प्रतिमा हातात घेऊन ते या शोभायात्रेत सहभागी झाले होते. द्वारकामाईत श्री साईसच्चरिताच्या पहिल्या अध्यायाचे पठन करून संस्थानच्या अध्यक्षांनी अखंड पारायणाचा 'श्रीगणेशा' केला. दुसरा व तिसरा अध्याय विश्वस्त श्री. दास इनामदार यांनी, चौथा अध्याय विश्वस्त श्री. भास्करराव बोरावके यांनी, तर पाचवा अध्याय विश्वस्त श्री. मोहन जयकर यांनी वाचला. श्रींची पाद्यपूजा विश्वस्त श्री. व सौ. शहाणे आणि विश्वस्त श्री. मधुकर दंडवते व सौ. दंडवते यांच्या हस्ते पार पडली. दुपारी ३.०० ते ५.०० या वेळेत ह.भ.प. प्रकाश महाराज गोंदीकर, श्रीक्षेत्र गोंदी, यांच्या कीर्तनास साईभक्तांचा मोठा जनसमुदाय उपस्थित होता. सायंकाळी श्री. अविराज तायडे व त्यांचे सहकारी, नाशिक, यांचा शास्त्रीय गायन, हार्मोनियम-वादन व कथक नृत्याचा कार्यक्रम पार पडला.

उत्सवाच्या मुख्य दिवशी, १५ ऑक्टोबर रोजी सकाळी अखंड पारायण सोहळ्याच्या सांगता शोभायात्रेत विश्वस्त श्री. मोहन जयकर, श्री. रमेश सोनी, डॉ. तुकाराम राठोड व श्री. राजीव रोहोम यांनी अनुक्रमे वीणा, पोथी व श्रींची प्रतिमा हातात घेऊन या सोहळ्यात सहभाग घेतला. मुख्य दिवशी श्रींची पाद्यपूजा संस्थानचे अध्यक्ष श्री. द. म. सुकथनकर व सौ. सुकथनकर आणि महाराष्ट्र शासनाचे नवनियुक्त मुख्य सचिव श्री. अजित निंबाळकर यांच्या हस्ते पार पडली. भिक्षाझोळी शोभायात्रेतही विश्वस्त मंडळाचे सदस्य व साईभक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दुपारी १२.०० वाजता आराधना विधी विश्वस्त डॉ. अरुण रासने व सौ. रासने आणि विश्वस्त सौ. सुनीता क्षिरसागर व डॉ. क्षिरसागर यांच्या हस्ते पार पडला. दुपारी ह.भ.प. श्री. प्रकाश महाराज गोंदीकर यांच्या कीर्तनास, तर सायंकाळच्या श्री. सच्चिदानंद आप्पा, मुंबई, यांच्या 'आवड साई भजनांची' या कार्यक्रमास साईभक्तांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. राज्याचे नवनियुक्त मुख्य सचिव श्री. अजित निंबाळकर यांनी पुण्यतिथी सोहळ्यास खास हजेरी लावून श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले.

या सोहळ्याच्या निमित्ताने विजयादशमीच्या सुमुहूर्तावर संस्थानचे अध्यक्ष श्री. द. म. सुकथनकर यांच्या हस्ते नव्याने उभारलेल्या अद्ययावत 'श्री साईनिवास' या अतिथीगृहाचे उद्घाटन पार पडले. त्याच दिवशी श्री



साईनाथ रुग्णालयात पुणे येथील साराटे इक्विपमेंट्स यांनी देणगी दिलेल्या इन्सिनरेटर




मूल्य : रु. ३०/- + टपालखर्च रु. २५/-



मूल्य : रु. ५/- + टपालखर्च रु. २०/-

मशीनचे उद्घाटन, तसेच श्री साईबाबा शैक्षणिक संकुलाच्या प्रवेशद्वारात उभारलेल्या मंदिरात सरस्वतीच्या मूर्तीची स्थापना व औ. प्र. संस्थेतील संगणक सुविधा असलेल्या सी. एन. सी. मशीनचे उद्घाटनही अध्यक्ष श्री. सुकथनकर व विश्वस्तांच्या उपस्थितीत झाले.


उत्सवाच्या तिसऱ्या दिवशी श्रींची पाद्यपूजा विश्वस्त श्री. प्रदीप पटेल व सौ. पटेल आणि विश्वस्त श्री. रमेश केंगे व सौ. केंगे यांच्या हस्ते झाली. ह.भ.प. प्रकाश महाराज गोंदीकर यांच्या दुपारच्या कीर्तनानंतर सायंकाळी सौ. हेमा उपासनी, औरंगाबाद, यांचा सुश्राव्य गायनाचा कार्यक्रम पार पडला.

उत्सवाची सांगता दिनांक १७ ऑक्टोबर रोजी झाली. विश्वस्त डॉ. अजेय गर्जे व सौ. गर्जे आणि विश्वस्त श्री. दास इनामदार व सौ. इनामदार यांच्या हस्ते श्रींची पाद्यपूजा झाली. गुरुस्थान येथे रुद्राभिषेक विश्वस्त व शिरडीचे नगराध्यक्ष श्री. कैलास बापू कोते व सौ. कोते आणि विश्वस्त श्री. देवराम पवार व सौ. पवार यांच्या हस्ते झाला. याच दिवशी सकाळी १०.०० वाजता ह.भ.प. प्रकाश महाराज गोंदीकर यांच्या उपस्थितीत गोपालकाला व दहीहंडीचा कार्यक्रम पार पडला.

श्री साईबाबांच्या ८४व्या पुण्यतिथीनिमित्त शिरडी गावातील ग्रामस्थांसाठी व साईभक्तांसाठी संस्थानच्या वतीने सकाळी १०.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत 'गावजेवण' देण्यात आले. प्रसादालयात पार पडलेल्या या सोहळ्यास ७५ हजार भाविकांनी हजेरी लावून महाप्रसाद घेतला. बुंदी, वरणभात व पुरीभाजीचा मेनू यानिमित्ताने ठेवण्यात आला होता. संस्थान औ. प्र. संस्थेतील शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी साईभक्तांना व ग्रामस्थांना महाप्रसाद वाढण्याची जबाबदारी उत्तमरीत्या सांभाळली.

या सोहळ्याच्या निमित्ताने विश्वस्त श्री. मोहन जयकर यांनी ४ किलो वजनाचा ७३ हजार रुपये किंमतीचा चांदीचा व त्यास सोन्याचा मुलामा असलेला कळस गुरुस्थानास अर्पण केला, तर मंदिराच्या नेहमीच्या वापराकरिता चांदीची भांडी विश्वस्त डॉ. विलास पोतनीस व डॉ. पद्मवार (नवी मुंबई) यांनी अर्पण केली.

गेल्या ८४ वर्षांतील शिरडीच्या परिवर्तित सुरेख लावण्याची, विविध विकास कामांची व साईभक्तांसाठी सुरू केलेल्या विविध सुविधांची साईभक्तांनी सोहळ्याच्या निमित्ताने वाखाणणी करून मनापासून समाधान व्यक्त केले.



❑❑❑

# संतश्रेष्ठ तुकाराम महाराज व छत्रपती शिवाजीराजेंची भेट

- डॉ. रामचंद्र देखणे

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज आणि छत्रपती शिवाजी महाराज यांची भेट हा महाराष्ट्राच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक व राजकीय जीवनातील एक महासमन्वय म्हणावा लागेल. इसवी सन १६३० ते १६८० हा छत्रपती शिवाजीराजांचा कालखंड, तर इसवी सन १६०८ ते १६४९ हा संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचा कालखंड. छत्रपती शिवाजी महाराजांनी तोरणा गड घेतला आणि तोरणा गडाचे तोरण स्वराज्याच्या प्रवेशद्वाराजवळ अभिमानाने झळकले. आता स्वराज्याच्या स्थापनेत साधुसंतांचे, गुरुजनांचे, योगी-समर्थांचे आशीर्वाद लाभावेत, या जिजाऊआईसाहेबांच्या इच्छेने शिवाजीराजांनी तुकाराम महाराजांची भेट घेतली. तुकोबारायांचे दर्शन घेतले. अनेक वेळा तुकाराम महाराजांच्या कीर्तन-श्रवणाचा लाभ घेतला. आई जिजाऊच्या संस्कारात मोठा झालेला शिवबा तुकोबारायांच्या विचाराने भारावून गेला. शिवाजी महाराजांचा जीवनप्रवाह नीति आणि कृती यांच्या भक्कम तीरामधून वाहू लागला. नीति आणि कृती यांचा समन्वय हीच क्षात्रधर्माची भक्ती होय. या भक्तिशिवाय शक्ती तरी कशी रहाणार ? शिवाजी महाराजांच्या जीवनात नीति, कृती आणि भक्ती यांचा आदर्श देणारी शक्ती तुकोबारायांच्या रूपात उभी राहिली आणि महाराष्ट्र धर्माचे आगळे-वेगळे रूप अनुभवायला मिळाले.

अध्यात्मनिष्ठीत राजकारणाचा आदर्श म्हणजे शिवाजीराजे, तर अध्यात्मनिष्ठीत समाजजीवनाचा आदर्श म्हणजे तुकोबाराय. पुरुषार्थाचे मूर्तिमंत रूप म्हणजे शिवाजीराजे, तर परमार्थाचे सात्त्विक रूप म्हणजे तुकोबाराय. संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनी भक्तितत्त्वाने पुरुषार्थ घडविला, तर शिवाजीराजांनी पुरुषार्थाने भक्तितत्त्वाचे रक्षण केले. धर्माने मोक्षाचा विचार देणारे ते तुकोबाराय, तर 'धर्म' हाच मोक्ष आहे याचे आचरण घडविणारे ते शिवाजीराजे. जगात प्रवृत्ती आणि निवृत्ती

**महाराष्ट्रातील नामवंत भारूडकार म्हणून डॉ. देखणे सर्वपरिचित आहेत. भारूड हा त्यांचा केवळ पीएच.डी.च्या प्रबंधाचा विषय नसून त्यांच्या जीवननिष्ठेचाच एक भाग आहे. अनेक वृत्तपत्रांत डॉ. देखणे यांचे स्तंभलेखन प्रसिद्ध होत आहे. 'साईलीला'च्या दसरा विशेषांकासाठी त्यांनी पाठविलेला लेख उशिरा हाती आल्याने तो या अंकात समाविष्ट केला आहे.**

अशा दोन वृत्ती असतात. प्रवृत्ती, निवृत्ती या हातात हात घालून जेव्हा चालतात तेव्हाच 'विवेक' जन्म घेतो. अविचाराची निवृत्ती आणि विचाराची प्रवृत्ती ही तुकोबारायांची वृत्ती, तर अधर्माची निवृत्ती आणि धर्माची प्रवृत्ती ही शिवाजीराजांची कृती. व्यावहारिक जीवनात दोघेही प्रवृत्ती - निवृत्तीला सवे घेऊनच वाटचाल करीत होते. तुकाराम महाराज सांगतात -

**तुका चालवितो कावडी । प्रवृत्ति निवृत्ति रोकडी ।**

प्रवृत्तीलाच निवृत्तीच्या पातळीवर नेऊन शिवाजीराजांनी राजकारण केले, तर निवृत्तीलाच प्रवृत्तीधर्माची जोड देऊन परमार्थाचा प्रपंच तुकोबारायांनी केला. म्हणूनच शिवाजीराजांनी राजे असूनही राजसिंहासनाकडे उपभोगशून्य भूमिकेतून पाहिले. राज्यपद हे उपभोग न मानता उपचार मानले. ज्ञानेश्वरमाउलींनी वर्णन केल्याप्रमाणे -

**ना तरी शिंपे जळी गळे पद्मपत्र ।**

पाण्यात राहूनही पद्मपत्र पाण्याच्या स्पर्शापासून दूर, तसेच राजसिंहासनी विराजमान होऊनही शिवाजीराजे हे राजभोगापासून अलिप्त राहिले. शिवाजीराजे आणि तुकाराम महाराज यांच्या भेटीने महाराष्ट्राला काय दिले, लोकजीवनात काय घडले, याचा विचार करताना एक गोष्ट

प्रामुख्याने सांगावी लागेल की, तुकोबारायांच्या भेटीने राजसत्तेला अध्यात्मसत्तेची जोड मिळाली आणि राजकारभार किती जाणतेपणी होऊ शकतो, याचा आदर्श उभा राहिला. थोडक्यात सांगायचे तर, या भेटीने महाराष्ट्राला **'जाणता राजा'** दिला.

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज आणि शिवाजीराजे यांच्या भेटीचे तपशीलवार वर्णन जरी इतिहासामध्ये फारसे उपलब्ध नसले तरी तुकाराम महाराजांच्या प्रासंगिक अभंगांमध्ये या भेटीचे स्पष्ट उल्लेख आढळतात. तुकाराम महाराजांच्या व्यक्तिमत्वाचे, त्यांच्या साधुत्वाचे गुणगान शिवाजीराजांपर्यंत पोहोचले आणि अशा महान संताच्या भेटीला जायचे त्यांनी ठरविले; पण भेटीला जाताना रिकाम्या हाताने कसे जायचे म्हणून प्रथम नजराणा पाठविला. नजराणा घेऊन शिवरायांचे सैनिक तुकोबारायांच्या घरी आले तेव्हा तुकाराम महाराज घरी नव्हते. राजाने हा नजराणा धाडला आहे, तो आपलाच आहे, हे सांगताच तुकाराम महाराजांची पत्नी हरखून गेली आणि मुलांसह ते दागिने अंगावर घालून नटून बसली. या नजराण्यामुळे आपले दैन्य फिटले, याचा आनंद तिच्या चेहऱ्यावर झळकू लागला. मात्र, जेव्हा तुकाराम महाराज घरी आले आणि घरातल्या साऱ्यांकडे आश्चर्याने पहात राहिले. काय घडले ते कळल्यावर वैष्णवाच्या गळ्यात तुळशीची माळ शोभते; सुवर्णमण्यांची नव्हे, त्यांनी पत्नीला समजावून सांगितले.

"... हे आपल्याला शोभत नाही. अनासक्त वृत्ती हे वैष्णवाचे लक्षण आहे. तू तर वैष्णवाची पत्नी आहेस. तूच आसक्ती धरलीस तर...

**दिवट्या छत्र्या घोडे। हे तो बऱ्यात न पडे।**
**आता येथे पंढरीराया। मज गोविसी कासया॥**

देवा, मला या कांचनात अडकविण्यासाठी का वैष्णव केलेस ? कनक, कांता चित्ता न येणे, हाच परमार्थ आहे. कनक हे आसक्तीचे मूळ आहे. विलासाच्या वैभवापेक्षा विचाराचे वैभव मोठे असते. खरे सांगायचे तर...

**तिही त्रिभुवनी। आम्ही वैभवाचे धनी।**

त्रिभुवनाला सारंकाही देणारा परमेश्वर आपल्या हातात असताना आता वेगळ्या वैभवाची जरूरीच काय ? आमच्या घरी शब्दरूपी धनाचा ठेवा आहे. शब्दांचीच राने आहेत. ती भक्तीच्या सूत्राने बांधून आपणच केलेला अलंकार परमेश्वराला अर्पण करायचा असताना हे वेगळे अलंकार घालून शरीर नटविण्यात काय अर्थ आहे ! हरीच्या नामगजराने विनटलो असताना वेगळ्या अलंकाराने का नटावे..." तुकोबारायांचा हा उपदेश म्हणजे अनासक्त वृत्तीचा आदर्शच. तो केवळ उपदेश केला नाही तर आचरणात आणला. ज्यांनी पूर्वजीवनात सावकारी केली, पण सामाजिक कळवळ्यापोटी सावकारीच्या वह्यादेखील पाण्यात बुडवून परमार्थाचे स्थान केले त्यांच्या जीवनात या नज़राणाभेटीने काय परिणाम होणार ! तुकोबारायांचा हा उपदेश बाजूला राहून शिवाजीराजांचे शिपाई ऐकत होते. ही निस्पृहता पाहून तेही प्रभावित झाले. राजांनी काहीतरी द्यावे म्हणून राजांच्या पुढे पुढे करणारे किंवा राजाने सन्मान करावा, सोन्याचा तोडा द्यावा आणि त्यासाठी राजाच्या नजरेत भरावे म्हणून वाटेल त्या क्लृप्त्या करणारे महाभाग त्याही काळात काही कमी नव्हते. धर्माच्या नावाने, परमार्थाच्या नावाने धनसंपत्ती उकळणारे ढोंगी त्याही काळात वावरत होते. कीर्तन-प्रवचनांतून अनासक्तीचा उपदेश करणारे व्यक्तिगत जीवनात अत्यंत आसक्त होते. म्हणूनच खरा साधू ओळखणेही अवघड होऊन बसले होते. या पार्श्वभूमीवर आचार-विचारांचा समन्वय असणारा तुकोबारायांसारखा महान सत्पुरुष भेटावा, हे केवढे भाग्य ! नजराणा घेऊन आलेल्या शिपायांना तुकाराम महाराजांनी समजावून सांगितले, शिवाजीराजांची स्नेहभावना आम्ही समजू शकतो; त्यांना आमचा एवढाच निरोप सांगा -

**आम्ही तेणे सुखी। म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखी।**
**येर तुमचे वित्त धन। ते मज मृत्तिकेसमान।**
**कंठी मिरवा तुळसी। व्रत करा एकादशी।**
**म्हणवा हरीचे दास। तुका म्हणे मज हे आस।**

भागवत धर्माचा आदर्श तुकोबांच्या रूपात उभा राहिला आणि राजधर्माचा आदर्श असणारे शिवाजीराजे त्यांच्या चरणी लीन झाले. पुढे अनेक वेळा शिवाजीराजांची आणि तुकाराम महाराजांची भेट झाली. शिवाजी महाराजांनी तुकाराम महाराजांचे कीर्तन अनेक वेळा ऐकले आणि

त्यांच्या प्रभावाने शिवाजी महाराजांनी एक अभंग लिहिला. तो अभंग तंजावरच्या सरस्वती महालामध्ये उपलब्ध झाला आहे.

**नासिवंत सुखासाठी । अंतरला जगजेठी ।**
**नाही नाही याते गोडी । लक्ष चौऱ्यांशीचे जोडी ।**
**मणुष जन्म गेल्यावारे । काय करशील बारे ।**
**शिवराजे सांगे जना । म्या तो सोडिली वासना ।**

प्रपंचामध्ये ज्याला आपण सुख मानतो ते सुख नाशिवंत आहे. फक्त परमात्म तत्त्व अविनाशी आहे. या नाशिवंत सुखाच्या मागे लागून आपण जगजेठीला अंतरले जात आहोत. खरे पाहिले तर, या सुखाच्या भोगानेच पुन्हा लक्ष चौऱ्याऐंशी फेरे घ्यावेच लागतात. मग यात गोडी कसली ? बा मनुष्या, आतातरी जागा हो ! हा मनुष्यजन्म एकदाच मिळालेला आहे. तो गेल्यावर पुन्हा काय करशील ! जीवनमुक्तीच्या भूमिकेतून विवेक विचारांच्या दृष्टीने हा नरदेहच सर्वांचे साधन आहे. ते बुडविल्यास हाती काय रहाणार ? शेवटी तर राजे लोकांना उद्देशून सांगतात की, या नाशिवंत सुखासाठी कारणीभूत ठरलेल्या वासनांचा मी तर त्याग केला आहे.

काही संशोधकांच्या मते, हा अभंग शिवाजी महाराजांचा नसावा; कारण पुरुषार्थ गाजविणारा, क्षात्रधर्म जागविणारा राजा असे निवृत्तीचे विचार कसे सांगेल. अभंग पहाता वरवर जरी निवृत्तीचे विचार असले तरी अंतरंगात शिरून त्याचे चिंतन केले असता, मिळालेले मानवी जीवन सफल करण्यासाठी, म्हणजेच खरा प्रवृत्ती धर्म जागविण्यासाठी आपण काय केले पाहिजे, याचेच चिंतन शिवाजी महाराजांनी घडविले आहे. राजा हे व्यक्तिमत्त्व व्यक्तिगत नसून सामूहिक असते. ही वासना राजभोगाची आहे. राजाने राजभोग त्यागला तरच व त्याला मिळालेल्या जीवनाचा उपयोग तो समाजासाठी प्रामाणिकपणे करेल आणि प्रजेत स्थिरावलेल्या जगजेठीला भेटेल. राजाने प्रजेत असणाऱ्या जगजेठीला अंतरणे योग्य नव्हे. हा अभंग राजधर्माच्या आदर्श तत्त्वांचे मार्गदर्शन करणारा आहे. संतांच्या भेटीने, संतांच्या दर्शनाने काय घडू शकते, याचे हे एक उत्तम उदाहरण आहे.


तुकाराम महाराजांनी शिवाजीराजांना केवळ निवृत्तीचाच उपदेश केला, असे नाही, तर खरा क्षात्रधर्म समजावून सांगितला. कर्मयोगाची जाणीव करून दिली. त्यासाठी समर्थांकडे जाण्याचीही विनंती केली. समर्थ रामदास स्वामी आणि तुकाराम महाराज यांच्या विचारांतून शिवाजीराजांची वैचारिक बैठक तयार झाली. महाराष्ट्राच्या राजसिंहासनाला ही बैठक आधारभूत ठरली. तुकाराम महाराजांचे 'पाईक' या प्रकरणातील अभंग हे सैनिकांना उद्देशून लिहिले आहेत.

**जिवाचे उदार शोभती पाईक ।**
**मिरवती नाईक मुगुटमणी ।**
**आपुलिया सत्ता स्वामीचे वैभव ।**
**भोगिती गौरव सकळसुख ।।**

यासारख्या 'पाईक'च्या अभंगांमधून तुकाराम महाराजांनी सैनिकांनाही उपदेश केला आहे. राज्य घडविण्यासाठी प्रथम त्यातली माणसे घडावी लागतात. तुकोबारायांच्या विचाराने माणसे घडली आणि त्याच राष्ट्रनिष्ठ माणसांच्या जोरावर शिवाजीराजांनी राज्यही घडविले. राजसत्तेचा आदर तुकोबारायांनी राखावा, तर अध्यात्मसत्तेच्या ठायी शिवाजीराजांनी विनम्र व्हावे आणि त्यातून आदर्श राजप्रणाली जन्माला यावी, हे महाराष्ट्राचे वैभवच म्हणावे लागेल.

– सी ३/४, डी. एस. के. चिंतामणी,
५१३ शनिवार पेठ, पुणे.

❑❑❑


।१ ।। अभंग ।।
नासिवंत सुखासाठी ।।
अंतरला जगजेठी ।। ना
हि नाहि याते गोडी ।।
लक्ष चौऱ्यांशीची जोडी ।। २ ।।
मणुष जन्म गेल्यावारे ।।
काय करशील बारे ।। ३ ।।
शिवराजे सांगे जना ।।
म्या तो सोडिली वासना ।।

सरस्वती महाल – तंजावर येथे उपलब्ध झालेल्या शिवाजी महाराजांनी रचलेल्या अभंगाचे स्वरूप

# ठाण्याचे दत्तमंदिर व आनंद भारती समाधी मठ

- भालचंद्र गद्रे

सद्गुरु श्री अक्कलकोट स्वामींचे अनेक शिष्य विविध ठिकाणी मठस्थापना व स्वामीनामाचा प्रचार करून भाविकांना मार्गस्थ करण्याचे काम करीत आहेत. ठाण्याचे पांडुरंग गुलाम नाखवा हेही स्वामींचेच शिष्य ! स्वामी आपल्या भक्तांना आपल्याकडे कसे खेचून घेतात व त्यांचे रक्षण हर प्रसंगात कसे करतात, याबाबत अनेक कथा 'बखरी'त आल्या आहेत. पांडुरंग यांच्याबाबतही अशीच एक घटना त्यांना स्वामींकडे खेचून घेऊन गेली.

## स्वामींनी जहाज वाचविले

पांडुरंग यांचा ओढा प्रथमपासूनच देवा-धर्माकडे होता. प्रातःस्मरण, भजन, प्रार्थना, नामस्मरण यांत त्यांचा जीव रमे. मासेमारीचा त्यांचा पिढीजात धंदा ! या धंद्यानिमित्त त्यांना समुद्रात खोलवर जावे लागे. एकदा असेच समुद्रात दूरवर गेल्यावर अचानक समुद्राला उधाण आले. त्याच्या लाटांनी क्षणार्धात रौद्ररूप धारण केले नि पांडुरंग ज्या जहाजाचे तांडेल (मुख्याधिकारी) होते ते जहाज समुद्रात हेलकावे खाऊन त्यात पाणी शिरल्याने बुडू लागले. आपल्याबरोबर इतर खलाशांचाही प्राण जाऊन जहाज बुडणार, हे लक्षात येताच, शेवटचा उपाय म्हणून पांडुरंगांनी क्षणार्धात जहाजावरच पद्मासन घालून स्वामींचे ध्यान केले व त्यांचा आर्ततेने धावा केला, "अक्कलकोटनिवासिनी आई, धाव ! आता आमचा काही उपाय चालण्यासारखा नाही. बहुतेक जहाज बुडाले." त्यावेळी स्वामी चोळाप्पाच्या घरी अक्कलकोटात होते. आपल्या भक्ताची आर्त हाक ऐकताच स्वामी पलंगावरून खाड्कन उठले व क्षणार्धात आपला उजवा हात खाली करून तो त्यांनी वर उचलला व तोंडाने "हुं...हुं...हुं..." असे बोलत ते पुन्हा पलंगावर बसले. त्यावेळी त्यांच्या हातातून पाणी पडू लागले असता सेवेकऱ्यांनी ते प्रसाद म्हणून घेतले, तो ते पाणी खारट लागले. याचे आश्चर्य वाटून त्यांनी स्वामींना विचारले, "महाराज, हा काय प्रकार आहे ? तुमच्या हातातून खारे पाणी कुठून आले ?" त्यावर स्वामी म्हणाले, "समुद्रातून जहाज उचलले ना !" सेवेकऱ्यांना त्यांच्या या संदिग्ध बोलण्याचा अर्थ कळेना. बहुतेक कुणा भक्ताचे स्वामींनी रक्षण केले असावे, असा अंदाज करून सारे गप्प बसले.

इकडे समुद्रात जहाजावर पांडुरंग स्वामींची प्रार्थना करून, यापुढील आयुष्य स्वामीसेवेतच घालविण्याची शपथ घेत होते. इतक्यात काय झाले कुणास ठाऊक, वारा थांबला, लाटा स्थिरावल्या व जहाज वर उचलले गेल्याचा सर्व खलाशांना भास झाला. त्यांनी मग जहाजातील पाणी उपसून जहाज परत किनाऱ्यास आणले. या जीवघेण्या प्रसंगातून रक्षण करून सर्वांचे प्राण रक्षण केल्याबद्दल पांडुरंगांनी किनाऱ्यावर येताच स्वामींचे मनापासून आभार मानले. आता यापुढे स्वामींना सांगितल्यानुसार पुढील आयुष्य त्यांच्याच सेवेत रुजू करण्यासाठी ते काही भक्तांसह तडक अक्कलकोटला निघाले. ते मठात पोहोचले त्यावेळी स्वामी सर्वांसह नामकीर्तनात रमले होते. पांडुरंगांस पहाताच स्वामी उठून उभे राहिले. त्याबरोबर धावत जाऊन पांडुरंगांनी स्वामींचे पाय धरले व सद्गदित होऊन ते म्हणाले, "स्वामी, आता हा संसार नको; आता तुमची सेवा हाच माझा संसार." त्यांच्या नयनांवाटे वहाणाऱ्या अश्रूंनी स्वामींच्या पायांवर अभिषेक झाला होता. स्वामींनी पांडुरंगांस उठवून पोटाशी धरले व ते म्हणाले, " अरे कोळ्याच्या पोरा, साध्या सागराला एवढा घाबरतोस ! तुला तर दुनियेचा सागर तरून जायचे आहे." स्वामींनी मग पांडुरंगांस अनुग्रह दिला, त्यांच्या मस्तकावर हात ठेवला व ते म्हणाले, "ये आनंद लेव और भारती हो जाव !" स्वामींच्या कृपेने कृतार्थ होऊन पांडुरंगांना दिव्य आनंद - ज्ञान अनायासे प्राप्त झाले.

मग आपली कथा पांडुरंगांनी तेथील सेवेकऱ्यांस सांगितली. तेव्हा मध्यंतरी स्वामींच्या हातून खारट पाणी का

गळत होते, याचा सर्व सेवेकऱ्यांना अर्थबोध झाला. साऱ्यांनी मग "श्री स्वामी समर्थ" या दिव्य - तारक मंत्राचा मोठ्याने जयघोष केला. काही दिवस तेथे थांबून पांडुरंग परत ठाण्यास आले. त्यांनी भगवी वस्त्रे धारण केली. औदुंबर वृक्षाखाली एक झोपडी बांधून ते तेथे राहू लागले व भजन - कीर्तनावाटे स्वामीनामाचा प्रचार करू लागले. स्वामींच्या कृपेमुळे पांडुरंग मग सिद्ध होऊन अनेकांच्या अडचणी, दु:खे, संकटे दूर होऊ लागल्याने लोक त्यांच्या दर्शनास येऊ लागले. हा...हा... म्हणता भक्त वाढू लागले व भक्तांचे पांडुबुवा यांना मग सर्वजण (स्वामींच्या उद्‌गारानुसार) 'श्री आनंद भारती महाराज' या नावानेच संबोधू लागले. आपले अनुयायी, भक्तगण घेऊन पांडुरंग अक्कलकोटला नेहमी जात. स्वामींच्या पादुका ठाण्यास स्थापन करण्याचा सर्वांचा विचार झाल्याने, त्यानुसार स्वामींच्या पादुका ते अक्कलकोटहून ठाण्यास घेऊन आले व औदुंबराजवळ (सध्याच्या दत्तमंदिराजवळ) एक मठ बांधून तेथे त्यांनी या पादुकांची इ. स. १८६६ साली स्थापना केली. पुढे सर्व भक्तांच्या सहकार्याने तेथे मोठे सुंदर दत्तमंदिर बांधण्यात आले.

## जागृत दत्तमंदिर

ठाणे पश्चिम येथील चेंदणी कोळीवाड्यातील या दत्तमंदिरात इ. स. १८८० साली दत्तमूर्तीची स्थापना करण्यात आली. दत्तमूर्तीपुढेच संगमरवरी दगडाच्या स्वामींच्या मोठ्या पादुका स्थापन करण्यात आल्या असून गाभाऱ्याबाहेर डाव्या हातास स्वामींची सुबक मूर्ती व उजव्या हातास श्री आनंद भारती यांची संगमरवरी मूर्ती विराजमान झाली आहे. या दत्तमंदिरात हनुमान, शितलादेवी, शंकर, विठोबा-रखुमाई यांच्याही मूर्ती वेगवेगळ्या स्थानी स्थापन करण्यात आल्या आहेत. ठाणे रेल्वेस्थानकापासून पश्चिमेकडे अगदी जवळ असलेले हे दत्तमंदिर म्हणजे श्री अक्कलकोट स्वामींच्या जागृत पादुकांचेही श्रद्धास्थान बनले आहे. सर्व जाती-धर्मांचे लोक येथे नित्य सेवा-दर्शन घेत आहेत. मंदिराच्या बाहेर वड-पिंपळाचे एकत्र वृक्ष असून त्यास पार बांधला आहे. मंदिराच्या मागे औदुंबराचा डेरेदार वृक्ष दिमाखात उभा आहे. दिंडोरीचे श्री मोरेदादा यांनी स्वामीशिष्य श्री आनंद भारती महाराज यांनी स्थापन केलेल्या या प्रसन्न - सुंदर मंदिराची जागृती व महिमा पाहून येथे स्वामींचे अखंड सप्ताह व यज्ञ केले. त्यामुळे हजारो स्वामीभक्तांचे हे श्रद्धास्थान बनले असून त्यांना स्वामींची प्रचीती या मंदिरामुळे येत आहे. स्वामी जयंती, स्वामी पुण्यतिथी, महाशिवरात्र, आषाढी एकादशी, श्रावणमास, चंपाषष्ठी, दत्तजयंती हे उत्सव येथे भक्तिभावाने मोठ्या आनंदात साजरे केले जातात. दत्तजयंतीस सप्ताहभर भजन-कीर्तनाचे कार्यक्रम होतात.

## आनंद भारती समाधी मठ


श्री आनंद भारती महाराज यांचा जन्म इ. स. १८३१ साली झाला. त्यांचे वडील गुलाम नाखवा यांनी त्यांचे नाव 'पांडुरंग' ठेवले होते. स्वामीकृपेने पांडुरंगांच्या आयुष्यास पुढे वेगळेच वळण लागून त्यांनी अध्यात्माचा मोठा प्रचार करून स्वामीनाम वाढविले. इ. स. १९०१ साली चंपाषष्ठीस (मार्गशीर्ष) श्री आनंद भारती यांनी देह ठेवला. तत्पूर्वी श्री आनंद भारती यांच्या कृपेनेच त्यांचे शिष्य श्री. गोपाळराव विद्वांस यांनी 'गुरुलीलामृत' हे २१ अध्यायी स्वामीचरित्र (पोथी) पूर्ण केले. ही पोथी आजही अनेक भक्त श्रद्धेने वाचून स्वामीकृपेची प्रचीती घेत आहेत. श्री आनंद भारती यांची समाधी नौपाडा, समर्थ भांडारासमोर, ठाणे (प.) येथे असून हे स्थान 'लक्ष्मीनारायण' मंदिर म्हणून ओळखले जाते. दर गुरुवारी, संकष्टीस, तसेच चंपाषष्ठीस, स्वामींची जयंती / पुण्यतिथी येथे भक्तिभावपूर्वक साजरी केली जाते. श्री आनंद भारतींच्या समाधीस्थानामुळे याही मंदिरास जागृती असून अनेक भाविकांचे हे श्रद्धास्थान बनले आहे. महाराजांच्या समाधीवर लक्ष्मी-नारायण यांच्या मूर्ती स्थापन केल्या असून डाव्या अंगास गणपती व शंकरपिंड आहे. श्री आनंद भारती महाराजांचे हे समाधीस्थान व चेंदणी कोळीवाडा येथील दत्तमंदिर या जागृत स्थानांची प्रचीती भाविकांनी प्रत्यक्षच अनुभवावी इतकी ही स्थाने जागृत, पवित्र व प्रसन्न आहेत.

□□□

पुस्तक परिचय
अथा तो ग्रंथ जिज्ञासा

# ॥ श्री दासबोध नित्यपाठ ॥

## समर्थवाङ्मयप्रेमींना उपयुक्त निरूपण




सातारच्या 'कौशिक प्रकाशन'ने मराठी वाङ्मयविश्वात अनेक उत्तमोत्तम पुस्तके प्रकाशित करून मौलिक भर घातलेली आहे. ललित लेखसंग्रह, प्रवासवर्णने, व्यक्तिचित्रे, चिंतनात्मक, करविषयक अशा विविध विषयांवरील 'कौशिक प्रकाशन'च्या दर्जेदार पुस्तकांना साहित्यविश्वातील अनेक पुरस्कारही मिळालेले आहेत. या प्रकाशन संस्थेतर्फे नुकतेच प्रसिद्ध झालेले 'श्री दासबोध नित्यपाठ' हे अरूण गोडबोलेलिखित पुस्तक संस्थेच्या एकूण लौकिकास साजेसे आहे.

अरूण गोडबोले हे व्यासंगी लेखक आहेत. त्यांनी आजवर विविध विषयांवर पुस्तके लिहिलेली आहेत. समर्थ रामदासांच्या वाङ्मयाचा त्यांचा दांडगा अभ्यास आहे. 'मनाचे श्लोक - एक मागोवा' या पुस्तकाद्वारे त्यांच्या चिंतनात्मक लेखनशैलीचा - पैलूंचा यापूर्वी वाचकांना दर्शन झालेले आहे. त्याच आनंदवाटेवरील 'श्री दासबोध नित्यपाठ' हे आणखी एक मनस्वी लेखन आहे. समर्थवाङ्मयाच्या अभ्यासकांना व उपासकांना अत्यंत उपयुक्त असे हे पुस्तक आहे.

खरं तर श्री. गोडबोले हे समर्थांच्या सातारा नगरीतील करसल्लागार आहेत. वडिलांच्या माघारी श्री समर्थ सेवा मंडळ सज्जनगडचे अध्यक्षपद त्यांच्याकडे आले आणि त्यांच्या अभ्यासाला एक नेमके व्यासपीठ मिळाले. व्याख्याने व वृत्तपत्रस्तंभलेखनाचा 'श्रीगणेशा' झाला. सातारचे 'ऐक्य', पुण्याचे 'सकाळ' आणि बेळगावचे 'तरुण भारत' या दैनिकांमधून समर्थांच्या वाङ्मयावरील गोडबोले यांचे निरूपण घरोघर पोचले.

दासबोध हा केवळ ग्रंथ नसून समर्थांची वाङ्मयमूर्ती आहे. देव, देश आणि धर्मरक्षणाची प्रेरणा व स्फूर्ती देणारा असा दुसरा ग्रंथ नाही. ७८०० ओव्यांचा, वीस दशकांमध्ये प्रतिपाद्य अशा या ग्रंथाचे, वर्षभर रोज नित्यनेमाने काही वाचन घडावे अशा दृष्टीने श्री. गोडबोले यांनी त्यांच्या 'श्री दासबोध नित्यपाठ' या पुस्तकाची रचना केलेली आहे. ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या प्रवचनांचा ग्रंथ पाहून बहुतेक सर्वच प्रमुख धार्मिक ग्रंथांचे नित्यपाठरूपात निरूपण आता आपणास ग्रंथजगतात दिसून येते. गोडबोले यांच्या प्रस्तुतच्या 'श्री दासबोध नित्यपाठ' पुस्तकामागेही तीच प्रेरणा आहे. गोडबोलेंचे हे २४वे लेखनपुष्प आहे. त्यांच्या रौप्य महोत्सवी ग्रंथलेखनास सानंद शुभेच्छा. जाता जाता एक अनुभवी सूचना कराविशी वाटते, ती म्हणजे, धार्मिक पुस्तकाच्या वाचकांचे एकूण सरासरी आयुर्मान हे सुमारे ४५ ते ५५ धरले, तर बहुतेकांस चाळीशी (चष्मा) लागलेली असते. अशा वाचकांच्या दृष्टीने पुस्तकातील संगणकीय अक्षरजुळणीचा विचार करता अक्षरांचा आकार खूपच लहान वाटतो. पुढील आवृत्तीत अक्षरे मोठ्या आकारात घेतल्यास ग्रंथवाचनाचा आनंद द्विगुणीत करणारा ठरेल, असे वाटते. बाकी मुखपृष्ठ व छपाई उत्तम आहे. असाच 'दैनंदिन दासबोध' (कै. डॉ. सी. ग. देसाईलिखित) मनोरमा प्रकाशनने प्रसिद्ध केलेला आहे. त्या ग्रंथाशी या ग्रंथाची तुलना होणे शक्य आहे, असे वाटते.

- विद्यानंद

॥ श्री दासबोध नित्यपाठ ॥
लेखक : अरूण गोडबोले
कौशिक प्रकाशन, शनिवार पेठ,
सातारा.
पाने ३६८ किंमत रु. २२५/-



साई अनुभव

## दत्तावतारी साईबाबांनी अकल्पित दत्तदर्शन घडविले !

**स**न १९९९मधील मे महिन्यात माझे आई-वडील, मी, माझी पत्नी व मुलगा पंढरपुरला गेलो होतो. त्याच महिन्यात मुंबईमध्ये भारतमाता सिनेमागृहामध्ये आम्ही श्री स्वामी समर्थांचा "भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे !" हा चित्रपट पाहिला होता. पंढरपुरला ज्या धर्मशाळेत आम्ही उतरलो होतो तेथे कळले की, अक्कलकोट तेथून जवळ, म्हणजे ३ तासांच्या अंतरावर आहे; म्हणून आम्ही अक्कलकोटला गेलो आणि स्वामी समर्थांचे डोळे भरून दर्शन घेतले. तेथे मठामध्ये एक रात्र राहून दुसऱ्या दिवशी गाणगापुरला श्री दत्तात्रेयांच्या दर्शनास गेलो. तेथील नदींच्या संगमावर स्नान करून आम्ही दत्तदर्शनाला निघालो. वाटेत भस्ममय डोंगराचे दर्शन घेतले. कर्नाटक प्रांतात प्रथमच गेलो होतो. तेथील भाषा आम्हाला अपरिचित होती. तिकडच्या लोकांना ना मराठी ना हिंदी समजत होते. त्यामुळे आमची काहीशी अडचण झाली. दत्तदर्शन घेऊन आरती झाल्यावर प्रथेप्रमाणे आम्ही माधुकरी मागावयास गेलो. पाच घरी आम्हाला भरपूर भिक्षा मिळाली. अन्न पक्वान्न होते. कोणी शिरा, कोणी पुरणपोळी, कोणी दहीभात, तर कोणी खिचडी इत्यादी अन्नपदार्थ दिले. भिक्षेत मिळालेले अन्नसुद्धा वाटून खावे, अशी धारणा असल्यामुळे आम्ही ते भिक्षान्न वाटून खाल्ले.

परतीचा प्रवास कसा करावा, याची माहिती घेतली. तीर्थक्षेत्राच्या डेपोमधून थेट मुंबईला जाण्यासाठी गाडी नव्हती. त्या डेपोमधून गाणगापूर रेल्वेस्थानकावर एस. टी. बसने गेलो. तेथे चौकशी केली असता, संध्याकाळी ४.३० वाजता मद्रास मेल येते, हे समजले. स्लिपर डब्याची तिकिटे नव्हती. म्हणून आम्ही चालू डब्याची तिकिटे घेतली. चालू डबा गाडीच्या पुढच्या बाजूला येत असल्याने आम्ही पुढे जाऊन उभे राहिलो. परंतु, मिलिटरीचा खास डबा चालू डब्याच्या जागी जोडला गेल्यामुळे चालू डबा मागच्या बाजूला जोडण्यात आला होता. गाणगापूर स्टेशनवर गाडी फारच थोडा वेळ थांबते. त्यामुळे आमची अक्षरशः तारांबळ उडाली. अखेरीस कसेबसे एकदाचे आम्ही स्लिपर डब्यात चढलो. सोलापुरला उतरून चालू डबा पाहिला, तर तो अगदी खच्चून भरला होता. म्हणून पुन्हा आम्ही त्याच अगोदरच्या डब्यात गेलो.

माझी आई रेल्वेमधून प्रथमच लांबचा प्रवास करीत होती. डब्यात टी. सी. येऊन पकडेल वगैरे विचाराने ती पार घाबरून गेली होती. आम्ही तिची समजूत काढण्याचा प्रयत्न केला; परंतु तो निरुपयोगी ठरला. शेवटी तिला साईबाबांचा धावा करण्यास सांगितले. तिच्यासह आम्ही सर्व बाबांचे नामस्मरण करू लागलो. सोलापुरला डब्यातील काही प्रवासी उतरले होते. म्हणून आम्ही बोगीत आत गेलो. तेथे पुण्याचे पाच विद्यार्थी बसले होते. त्यांनी आईला, वडिलांना व पत्नीला बसायला जागा दिली. तेथे बसल्यावर चार ते पाचवेळा टी. सी. आले. त्यांनी इतरांकडून चालू तिकिटांवर अधिक भार घेतला. परंतु, आमची तिकिटे तपासूनसुद्धा आम्हाला अधिक भार विचारला नाही. फक्त एका टी. सी.ने पुण्यानंतर अधिक भार भरण्याचा सल्ला दिला. मात्र, तो टी. सी. नंतर आमच्याकडे आलाच नाही. अशाप्रकारे दत्तावतारी साईबाबांनी आम्हावर अलोट कृपा करून दत्तावतारी श्री समर्थ अक्कलकोट स्वामी व श्री दत्तात्रेयांचे अकल्पित सुखनैव दर्शन घडविले. साईबाबांच्या या अलौकिक अद्‌भूत अनुभवाने आम्ही स्तंभित झालो, भारावलो आणि नकळत मिटल्या गेल्या डोळ्यांसमोरील साईमूर्तीला आमचे हात जोडले गेले.

**- सुनिल गुरव**

१/४, परमानंद करसनदास पत्राचाळ,
नारायण मिल गल्ली, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई.

# साईंना साकडे घातले... आणि अरिष्ट दूर झाले !

**जो जो मज भजे, जैसा जैसा भावे।**
**तैसा तैसा पावे, मी ही त्यासी ॥**
**शरण मज आला, आणि वाया गेला।**
**दाखवा दाखवा, ऐसा कोणी ॥**

**ख**रोखर, साईबाबांवर श्रद्धा ठेवा व सबुरी धरा; साईकृपेचा प्रसाद मिळालाच पाहिजे. मी बाबांची भक्त असून मला आलेला अनुभव येथे कथन करीत आहे.


तीन वर्षांपूर्वी माझ्या बहिणीच्या १२ वर्षांच्या मुलाला मानेवर गाठ आली होती. प्रथमदर्शनी डॉक्टरनेसुद्धा चरबीच्या गाठीचे निदान केले व औषधाने गाठी आपोआप कमी होतील असे सांगितले. आम्हीसुद्धा मग त्याकडे दुर्लक्ष केले. असेच काही महिने गेले आणि मग त्या गाठी वाढत चालल्याची जाणीव आम्हाला झाली. त्या गाठी लांबूनही दिसू लागल्या. मग डॉक्टरने ऑपरेशन करून त्या काढण्याचा सल्ला दिला. साधारण एप्रिल १९९९मध्ये ऑपरेशन ठरले. ऑपरेशन व्यवस्थित होऊन गाठी काढल्या गेल्या. शरीरातील कोणताही भाग ऑपरेशनने काढल्यावर तो चेकअपसाठी पाठवावा लागतो; म्हणून त्या गाठी लॅबमध्ये चेकअपसाठी पाठविल्या आहेत, असे डॉक्टरने आम्हाला सांगितले. भाच्याची प्रकृती उत्तम होती. ८-१० दिवसांनी रिपोर्ट आला आणि आम्ही सगळेजण पार हादरून गेलो. त्या गाठींमध्ये कॅन्सरचे अंश सापडल्याने आमच्या पायाखालची जमीनच सरकली. तिकडे माझी बहीण व तिचे यजमान यांना काहीच सुचत नव्हते. एवढ्या मोठ्या आजाराचे नाव ऐकून त्यांची झोपच उडाली.

मी बहिणीला फोन केला तेव्हा फोनवर तिने आपल्या कोंडलेल्या भावनांना मोकळी वाट केली. मला तिचे फोनवर सांत्वनही करता येईना; तरीही मी स्वतःला सावरले व तिची समजूत घातली. आम्ही लहानपणापासून साईबाबांचे भक्त आहोत. लग्नानंतरही वर्षातून एकदा बाबांच्या कृपेने आमची शिरडीला वारी असते. आम्ही बाबांच्या गुरुवारी उपवास, तसेच साप्ताहिक पोथीपारायण बाबांच्या कृपेने पार पाडले आहे. मी बहिणीला सांगितले, आपली भक्ती वाया जाणार नाही; तू धीर धर ! या संकटातून बाबा आपल्याला नक्कीच बाहेर काढतील. मग, जणू बाबांनीच मला दिलेल्या प्रेरणेने मी बहिणीला साईरुद्राध्यायाचे रोज पारायण करावयास, बाबांचा जप (ॐ श्री साईनाथाय नमः) सतत मुखात चालू ठेवण्यास व भाच्याला पाण्यातून उदी देण्यास सांगितले. डॉक्टरने दर १५ दिवसांनी १ याप्रमाणे आठ डोस मोठ्या इंजेक्शनचे घेण्यास सांगितले. हे ऐकल्यावर मी बहिणीला, डोस चालू असताना बाबांचे नाव घेत भाच्याच्या डोक्यावर हात ठेव; त्याला डोसचा त्रास जाणवणार नाही व साइड-इफेक्टसुद्धा होणार नाहीत, असे सांगितले. मीही ज्या दिवशी भाच्याचा डोस असे त्या दिवशी बाबांना हात जोडून विनंती करीत असे की, ''बाबा, माझी बहीण तुम्हाला शरण आली आहे आणि तुमच्या पदरात तिचे लेकरू आहे. आता त्याचा सांभाळ करणे तुमच्या हाती आहे. बाबा, मला प्रचीती द्या !'' आणि खरेच, डोसच्या वेळी भाच्याला १-२ तासच थोडासाच त्रास जाणवायचा. डॉक्टरने मुलाला बरेच साइड-इफेक्ट होतील, असे सांगितले असतानाही भाच्याला फारसा त्रास जाणवत नव्हता. बहिणीला धीर येऊ लागला. ८ डोस पूर्ण झाल्यावर मानेवरच्या राहिलेल्या आतील गाठी वितळायला लागल्या. उत्तम प्रतिसाद पाहून डॉक्टरने ४ इंजेक्शनचे डोस वाढविले व मग रिपोर्ट बघून लाईट किती द्यावयाचे ते सांगू, असे सांगितले. माझी व बहिणीची बाबांकडे विनवणी चालूच होती. आणि काय आश्चर्य ! वाढीव ४ इंजेक्शन पूर्ण झाल्यावर डॉक्टरने ब्लड रिपोर्ट पाहून सांगितले की, रिपोर्ट नॉर्मल आहे; लाईट घेण्याची आवश्यकता नाही. माझा ऊर आनंदाने भरून आला. खरेच, बहिणीची अढळ भक्ती बाबांनी स्वीकारलेली पाहून मी धन्य झाले. डिसेंबर, १९९९पर्यंत सर्व डोस पूर्ण झाले. जानेवारी २०००मध्ये पूर्ण खात्रीकरिता डॉक्टरने शरीराचा एक्स-रे काढण्यास व सी.टी. स्कॅनिंग करण्यास सांगितले. बाबांच्या कृपेने ते रिपोर्टसुद्धा नॉर्मल आले. मग २-४ महिन्यांनी चेकअपसाठी ब्लड रिपोर्ट आणण्यास सांगितले. ते सर्व रिपोर्ट साईकृपेने नॉर्मल आले. खरोखर, बाबा ! तुमची लीला अगाध आहे.

त्यानंतर अचानक बाबांच्या बुलाव्याने बहिणीला सहकुटुंब शिरडीला जाण्याचा योग आला. मग मलाही बाबांनी सहकुटुंब शिरडीची वारी घडवून नवस फेडण्याची संधी दिली.

आज हा अनुभव 'साईलीला'त देताना मी पुन्हा एकदा बाबांना विनवणी करते की, असाच तुमचा कृपाप्रसाद सदैव साईशिकवण आचरणाऱ्यांना मिळो !

**- एक साईभक्त**
**मुंबई.**



अभिप्राय

# सर्वांगसुंदर



'साईलीला'चा अंक जेव्हा जेव्हा घरी येतो तेव्हा जणू श्री साईबाबाच घरी आले, असे वाटते. मुखपृष्ठ, तसेच आतील भागातील चित्रे पाहत असताना आपण शिरडीत असल्याचा भास होतो. अंतरंगातील लेख उद्बोधक व वाचनीय असतात. अशीच ज्ञानवर्धक माहिती 'साईलीला'द्वारे वेळोवेळी साईभक्तांना मिळो, हीच अपेक्षा. अशा उत्कृष्ट लेख व सजावटीमुळे श्री साईबाबांवरील भक्तांची श्रद्धा अधिक दृढ होईल.

**- निलेंद्र बाळाराम झाडराव**
२५८, वारीन पाडा, खारदांडा,
खार (प.), मुंबई.



'साईलीला'च्या अंकांचे स्वरूप दिवसेंदिवस फारच छान होत आहे. माहितीही बरीच मिळते. वाचून समाधान होते. उत्तरोत्तर असेच भरभराटीचे कार्य आपल्या हातून घडो, श्री बाबांपाशी हे मागणे आहे.

**- सौ. विमल टिळक**
३५८ अ, दत्तप्रसाद,
१४वा रस्ता, खार (प.),
मुंबई.



'साईलीला : दसरा-दिवाळी विशेषांक २००२' मिळाला. प्रस्तुत अंक मला मनोमन आवडला. त्यासाठी आपण सुरेख नियोजन केले आहे. अंबेजोगाई, पंढरपूर, पैठण, सज्जनगड, शेगाव ही धर्मक्षेत्रे महत्त्वाची आहेत. श्रीक्षेत्र शिरडी आणि ही अन्य क्षेत्रे यांवरील अभ्यासपूर्ण लेख या अंकात आहेत. अंकाची मांडणी व छपाई कलात्मक आहे. मी आपले अभिनंदन करतो.

**- डॉ. हे. वि. इनामदार**
'संतोष', भारतीनिवास कॉलनी, ६०/१५ एरंडवणे, पुणे.

दिवाळी अंक मिळाला. विविध संतांवरील मान्यवरांनी दिलेली नेमकी माहिती निश्चितच वाचनीय आहे. अल्पकिंमतीतील दिवाळी अंक छान आहे. मुखपृष्ठावरील चित्र दिवाळीची आठवण करून देणारे असून मुखपृष्ठाची संकल्पना व मांडणीबद्दल संबंधितांस धन्यवाद. बाबांचे निवडक आशयघन अनुभव एकत्रित करून एक संग्राह्य अनुभव विशेषांक जरूर काढावा. हा विशेषांक वाचकांना/भाविकांना नक्कीच भावेल आणि त्यांच्यामध्ये भक्तीची/श्रद्धेची ज्योत कायम तेवत ठेवेल. अवश्य विचार व्हावा.

**- भालचंद्र गन्द्रे**
ठाणे.



'साईलीला'चा दिवाळी विशेष अंक पावला. आवडला. अंकाचं अत्यंत आकर्षक, लक्षवेधी मुखपृष्ठ, अर्थपूर्ण अंतरंग अन् महाराष्ट्रातील निवडक क्षेत्रमहिमा - आवर्जून घेतलेला वेध सर्वच लक्षणीय. अंकाचं सर्वार्थानं देखणेपण राखण्यासाठी आपण व आपल्या साईपरिवारानं घेतलेल्या परिश्रमाबद्दल विशेष अभिनंदन. नाथांचे पैठण 'पैठणी'त चितारल्याबद्दल इकडे अनेकांचे उत्तम अभिप्राय आहेत.

**- डॉ. कुमुद गोसावी**
'स्नेहकुंज', ११ सरस्वती कॉलनी (पू.),
औरंगाबाद.



# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## प्रकाशित पुस्तकांची सूची

| अ. क्र. | पुस्तकाचे नाव | भाषा | मूल्य + टपाल खर्च |
|---|---|---|---|
| १. | श्री साई सच्चरित पोथी | मराठी | ५५.०० + टपाल खर्च |
| २. | श्री साई सच्चरित | इंग्रजी | २०.०० + टपाल खर्च |
| ३. | श्री साई सच्चरित | हिंदी | २५.०० + टपाल खर्च |
| ४. | श्री साई सच्चरित | गुजराथी | ४०.०० + टपाल खर्च |
| ५. | श्री साई सच्चरित | कन्नड | ३३.०० + टपाल खर्च |
| ६. | श्री साई सच्चरित | तेलुगु | २५.०० + टपाल खर्च |
| ७. | श्री साई सच्चरित | तामीळ | ३७.०० + टपाल खर्च |
| ८. | श्री साई सच्चरित | उर्दू | ५१.०० + टपाल खर्च |
| ९. | श्री साई सच्चरित पोथी | सिंधी | ५०.०० + टपाल खर्च |
| १०. | श्री साई सच्चरित पोथी | गुजराथी | ७२.०० + टपाल खर्च |
| ११. | श्री साई सच्चरित पोथी | कन्नड | ८८.०० + टपाल खर्च |
| १२. | श्री साईलीलामृत | मराठी | १५.०० + टपाल खर्च |
| १३. | श्री साईलीलामृत | हिंदी | १७.०० + टपाल खर्च |
| १४. | श्री साईलीलामृत | गुजराथी | १६.०० + टपाल खर्च |
| १५. | अवतार व कार्य | मराठी | ०७.०० + टपाल खर्च |
| १६. | स्तवन मंजिरी | मराठी | ०१.२५ + टपाल खर्च |
| १७. | स्तवन मंजिरी | हिंदी | ०३.०० + टपाल खर्च |
| १८. | स्तवन मंजिरी | गुजराथी | ०३.०० + टपाल खर्च |
| १९. | स्तवन मंजिरी | इंग्रजी | ०२.०० + टपाल खर्च |
| २०. | सगुणोपासना (आरती) | मराठी | ०२.०० + टपाल खर्च |
| २१. | सगुणोपासना (आरती) | हिंदी | ०३.०० + टपाल खर्च |
| २२. | सगुणोपासना (आरती) | गुजराथी | ०३.०० + टपाल खर्च |
| २३. | सगुणोपासना (आरती) | तेलुगु | ०६.०० + टपाल खर्च |
| २४. | सगुणोपासना (आरती) | सिंधी | ०७.०० + टपाल खर्च |
| २५. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | ०३.७० + टपाल खर्च |
| २६. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ०८.०० + टपाल खर्च |
| २७. | मुलांचे साईबाबा | मराठी | ०३.०० + टपाल खर्च |
| २८. | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | ०४.०० + टपाल खर्च |
| २९. | मुलांचे साईबाबा | हिंदी | ०४.०० + टपाल खर्च |
| ३०. | मुलांचे साईबाबा | गुजराथी | ०५.०० + टपाल खर्च |
| ३१. | मुलांचे साईबाबा | तेलुगु | ०४.०० + टपाल खर्च |
| ३२. | रुद्राध्याय (अ. ११वा) | मराठी | ०२.०० + टपाल खर्च |
| ३३. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | १२.०० + टपाल खर्च |
| ३४. | साईबाबा ऑफ शिरडी (भरुचा) | इंग्रजी | ०७.०० + टपाल खर्च |
| ३५. | साईबाबा ऑफ शिरडी (प्रधान) | इंग्रजी | ०६.०० + टपाल खर्च |
| ३६. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | ३०.०० + टपाल खर्च |
| ३७. | खापर्डे डायरी | इंग्रजी | ११.०० + टपाल खर्च |
| ३८. | दादासाहेब खापर्डे यांची शिरडी रोजनिशी | मराठी | १५.०० + टपाल खर्च |
| ३९. | विष्णुसहस्रनामावली | मराठी | ०२.५० + टपाल खर्च |

सूचना : **कृपया सुधारित मूल्य व टपाल खर्चासाठी लिहावे.**

# साईभक्तांना आवाहन



**प्रिय साईभक्तांनो !**

सप्रेम नमस्कार,

आपण 'साईलीला'चे वाचक आणि वर्गणीदार आहात. 'साईलीला'चे नवे स्वरूप आपणा सर्वांनाच आवडले आहे. तशी पत्रे आम्हाला येत आहेत. त्याबद्दल धन्यवाद !

श्री साईबाबांचे कार्य, त्यांची शिकवण, भक्तांना आलेले त्यांचे अनुभव आणि अध्यात्माचा प्रसार अधिकाधिक लोकांत करणे म्हणजेच साईसेवा आहे. त्यासाठी 'साईलीला' सर्वाधिक लोकांपर्यंत पोहोचावयास हवी. या साईसेवेत आपण वाढ करू शकता !

आपण फक्त पाच वर्गणीदार 'साईलीला'स मिळवून द्यायचे. त्यामुळे आपल्या हातूनही साईसेवा घडेल आणि श्री साईबाबा आपल्यावर कृपा करतील याची आपणासही कल्पना आहेच.

तरी, खालील फॉर्मवर पाच वर्गणीदारांचे पत्ते व प्रत्येकी ५० रु. प्रमाणे एकूण २५० रु. पाठवावे.

कळावे. **श्री साईबाबांच्या आशीर्वादासह !**

आपला स्नेहांकित,
**विद्याधर ताठे**
कार्यकारी संपादक, **'साईलीला'**

---

कार्यकारी संपादक,
**'साईलीला'**,
८०४-बी, साईनिकेतन,
डॉ. आंबेडकर रोड, दादर (पू.),
मुंबई- ४०० ०१४.

यांस,

आपण साईभक्तांना आवाहन केल्याप्रमाणे सोबतच्या जोडलेल्या कागदावर पाच वर्गणीदारांचे पत्ते पाठवीत असून त्यांची प्रत्येकी वार्षिक वर्गणी ५० रु. प्रमाणे रु. २५० (एकूण दोनशेपन्नास मात्र) सोबत मनीऑर्डरने/चेकद्वारा/रोख पाठवीत आहे. त्याचा स्वीकार व्हावा.

श्री साईबाबांच्या शिकवणुकीचा प्रसार करण्याची संधी आपण यानिमित्ते मला देऊन साईसेवा करण्यास उद्युक्त केलेत याबद्दल आभारी आहे. कळावे.

आपला,

नाव : ______________________

पत्ता : ______________________


______________________

(ता. क. : सोबतच्या कागदावर पाच नव्या वर्गणीदारांचे पत्ते जोडले आहेत.)

# श्री साई पुण्यतिथि उत्सव २००२



भिक्षाझोळी - श्री साई पुण्यतिथि उत्सवात
साईजीवनातील दिनक्रमाचे खास स्मरण



कथक नृत्यातील एका मनोरम भावमुद्रेत नृत्यांगना



भावमय भक्ति-संगीत



शतचंडी यज्ञ - पूर्णाहुतीचा एक पावन क्षण




साईदरबारात आपली कीर्तनसेवा सादर करताना
बालप्रवचनकार ह. भ. प. वैभवमहाराज हांडे



श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या मालकीचे हे द्वैमासिक द. म. सुकथन... प्रेस, ... संपादक : ... कार्यकारी संपा...
मुंबई येथे छापून साईलीला कार्यालय, साईनिकेतन, * पी. आर. बी. ...
८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई येथे प्रकाशित केले.